दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ शुक्रवार, दि.२१ फेब्रुवारी २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १३४ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

रिक्षा चोरणाऱ्याला मानखुर्दमधून अटक

मुंबई : रस्त्यालगत उभी केलेली रिक्षा चोरून विक्री करणाऱ्या एका सराईत आरोपीला मानखुर्द पोलिसांनी अटक केली. या आरोपीच्या ताब्यातून पोलिसांनी तीन रिक्षा हस्तगत केल्या असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. मानखुर्दच्या पीएमजीपी कॉलनी परिसरात राहणारे रिक्षाचालक प्रदीप माने (२५) यांनी आपली रिक्षा घराजवळ उभी केली होती. मात्र अज्ञात चोराने रात्री रिक्षा चोरली. याप्रकरणी माने यांनी मानखुर्द पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी रिक्षाचा शोध सुरू केला. परिसरातील सीसी टीव्ही कॅमेऱ्यांतील चित्रण तपासल्यानंतर पोलिसांना शिवाजी नगर परिसरात एका रिक्षाचा अपघात झाल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता ती माने यांची चोरीला गेलेली रिक्षा असल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी रिक्षाची कसून तपासणी केली. पोलिसांना रिक्षामध्ये एक मोबाइल सापडला. या मोबाइलच्या आधारे तपास करून पोलिसांनी आरोपी करीम काजी (३२) याला अटक केली. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. मानखुर्द परिसरातून दोन तर ट्रॉम्बे परिसरातून एक अशा एकूण तीन रिक्षा त्याने चोरल्याची कबुली दिली. याप्रकरणी पोलिसांनी काजीला अटक केली असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र : केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार

मुंबई विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनात पदांना मान्यता



वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : मुंबई विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्रात प्राध्यापक आणि संशोधक पदांना मान्यता दिली जाणार आहे. तसेच कलिना संकुलात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी दोन स्वतंत्र वसतीगृहे आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना केली जाणार असल्याची घोषणा केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांनी मुंबई विद्यापीठात केली.

मुंबई विद्यापीठात आयोजित संविधान अमृत महोत्सव कार्यक्रमात त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. मुंबई विद्यापीठात नव्याने स्थापन होणारे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र माता रमाबाई आंबेडकर यांच्या नावाने ओळखले जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. मुंबई विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र, लोकमान्य टिळक अध्यासन केंद्र आणि श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या संविधान अमृत महोत्सव कार्यक्रमासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाचे सचिव अमित यादव, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे, प्रा. मनिषा करणे, अनिल कुमार पाटील, प्रभात कुमार सिंह यांच्यासह विविध मान्यवर आणि विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. वीरेंद्र कुमार म्हणाले, संविधान अमृत महोत्सव हा अत्यंत स्तुत्य उपक्रम असून मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

संविधान जगण्याची चौकट आणि समानतेचं प्रतीक - उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्याचे मोठे अमूल्य कार्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. संविधान ही जीवन जगण्याची चौकट आहे. भारतीय संविधान बदलले जात असल्याचा चुकीचा प्रचार केला जात आहे. महिलांना विधानसभा व लोकसभेत ३३ टक्के आरक्षण, सर्वांना मोफत शिक्षण, विद्यार्थ्यांना आर्थिक निकषांवर नोकरीत आरक्षण अशा तरतुदी करण्यात आल्या. भारतीय संविधान हा एक जिवंत दस्तऐवज असून तो वाचून समजून घेणे महत्वाचे आहे. आपल्या अधिकार आणि कर्तव्याची जाणीव संविधानामुळे होत असून सामाजिक, आर्थिक जीवन जगण्याचा मार्ग संविधानामुळे मिळत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना मतदानाचा समान अधिकार दिला त्याबद्दल आपण सदैव त्यांच्या ऋणात राहू, असेही मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी सांगितले.

मुंबई विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चेअर, दोन वसतीगृहे आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र जाहीर केल्याबद्दल मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांचे आभार मानले. विद्यापीठामार्फत लवकरच या अनुषंगाने प्रस्ताव सादर केला जाणार असल्याचे सांगून भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त मुंबई विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांत विविध उपक्रम राबविले जाणार असल्याचेही प्रा. कुलकर्णी यांनी सांगितले. यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाचे सचिव अमित यादव यांनी आपल्या उदबोधनात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानावर प्रकाश टाकला.

ज्यपालांच्या उपस्थितीत राजभवन येथे अरुणाचल प्रदेश व मिझोरम राज्य स्थापना दिवस; राज्यपालांकडून सिडनहॅम महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : अरुणाचल प्रदेश व मिझोरम या उत्तरपूर्वेकडील राज्यांची संस्कृती व लोककला आपल्या गीत व नृत्याद्वारे उत्कृष्टपणे सादर केल्याबद्दल राज्यपाल तसेच कुलपती सी पी राधाकृष्णन यांनी आज सिडनहॅम महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप दिली. महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी संजीवनी भेलांडे यांनी आपल्या सुरेल स्वरांनी अरुणाचल प्रदेशचे राज्यगीत सादर केल्याबद्दल राज्यपालांनी त्यांचा विशेष सत्कार केला.

राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राजभवन येथे अरुणाचल प्रदेश व मिझोरम राज्यांचा राज्य स्थापना दिवस साजरा करण्यात आला, त्यावेळी राज्यपालांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत आयोजित या कार्यक्रमाचे आयोजन राजभवनातर्फे डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या सहकार्याने करण्यात आले होते.

विभिन्न धर्म, जात, संप्रदाय व भाषा बोलणारे लोक देशात गुण्यागोविंदाने राहत असून गेल्या काही वर्षांमध्ये दोन्ही राज्यांनी अनेक क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. यांच्या काळात उत्तरपूर्व राज्यांच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या ११ वर्षांमध्ये तेथील सर्व राज्यांना रेल्वे, रस्ते तसेच हवाई मार्गाने जोडले आहे. भारत सरकारच्या '?क्ट ईस्ट' धोरणामुळे उत्तरपूर्वेकडील राज्ये दक्षिण आशियाई देशांशी जोडले गेले असून आगामी काळात आपण इंडोनेशियापर्यंत रस्ते मार्गाने जोडले जाऊ. उत्तरपूर्व राज्ये ही स्वित्झर्लंड प्रमाणे निसर्ग सौंदर्याने नटली असून विदेशात जाण्याअगोदर लोकांनी आपल्या देशातील उत्तरपूर्व राज्यांना भेट द्यावी असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले. अरुणाचल प्रदेश येथे लोक परस्परांना भेटतात त्यावेळी ते 'जय हिंद' म्हणतात ही गोष्ट सर्वांनी शिकण्यासारखी आहे. विविध राज्यांचे राज्यस्थापना दिवस साजरे केल्यामुळे राज्यातील लोकांना त्या त्या राज्यांच्या लोककला व जनजीवन याबद्दल अधिक माहिती मिळत असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

यावेळी विद्यापीठाच्या सिडनहॅम महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अरुणाचल प्रदेश व मिझोरम राज्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारा लोक गीत व नृत्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला तसेच दोन्ही राज्यांची माहिती देणारे माहितीपट सादर केले. कार्यक्रमाला राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे, उपसचिव एस राममूर्ती, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरु डॉ राजनीश कामत यांसह सिडनहॅम व इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू, भिवंडीतील घटना

वृत्तसंस्था ■ ठाणे



ठाणे : भिवंडी येथील जुन्या मुंबई-आग्रा रोडवर टँकरच्या धडकेत एका दुचाकी स्वाराचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी उघडकीस आली आहे. याप्रकरणी मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी नारपोली पोलीस ठाण्यात टँकर चालका विरोधात तक्रार नोंदवली असून पोलिसांनी या तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल केला आहे.

सनी निषाद (१६) असे अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव आहे. भिवंडीतील कामतघर परिसरात तो त्याच्या कुटूंबासह राहत होता. काही कामाकरिता बुधवारी सनी मित्राची दुचाकी घेऊन बाहेर गेला होता. काम झाल्यानंतर सनी मित्राला दुचाकी परत करण्यासाठी जात असताना देवजीनगरकडे जाणाऱ्या मार्गावर जुना मुंबई आग्रा रोड येथे त्याच्या दुचाकीला भरधाव वेगाने येणाऱ्या टँकरने धडक दिली.

या धडकेत सनी जमिनीवर पडला आणि टँकरच्या मागील टायर त्याच्यावरुन गेले. या अपघातात सनी गंभिरित्या जखमी झाला होता. त्याला उपचारासाठी भिवंडी येथील इंदिरा गांधी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतू, त्याच्या डोक्याला खूप मार बसल्यामुळे त्याचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी सनीच्या वडिलांनी टँकर चालक दिनेश रामप्रसाद गौन याच्या विरोधात नारपोली पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. पोलिसांनी या तक्रारीच्या आधारे टँकर चालका विरोधात गुन्हा दाखल केला असून त्यांच्याकडून पुढील तपास सुरु आहे.

दोन दिवसीय ग्रंथोत्सव शुक्रवार आणि शनिवारला

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत ग्रंथालय संचालनालय व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ व २२ फेब्रुवारी रोजी सत्यनारायण बजाज सार्वजनिक जिल्हा वाचनालय वर्धा येथे दोन दिवसीय ग्रंथोत्सव-२०२४ आयोजित करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रंथप्रेमी, साहित्यरसिक व नागरिकांनी ग्रंथ प्रदर्शन व विक्री व विविध साहित्यिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी नितीन सोनोने यांनी केले आहे.

२१ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा ग्रंथालय कार्यालय वर्धा येथून ग्रंथदिंडी निघणार असून अपर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचा शुभारंभ होणार आहे. सकाळी ११ वाजता राज्याचे गृह (ग्रामीण) गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार, खनिकर्म विभागाचे राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते ग्रंथोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार असणार आहे. कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून खासदार अमर काळे, आमदार सर्वश्री ?ड अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, समीर कुणावार, राजेश बकाणे, सुमित वानखेडे यांची उपस्थिती असणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी वान्मथी सी. मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधिक्षक अनुराग जैन, सहाय्यक ग्रंथालय संचालक रामदास साठे, जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते, शिक्षणाधिकारी माध्यमिक मनिषा भडंग, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, जिल्हा कोषागार अधिकारी शुभदा चिंचोळकर, जिल्हा नियोजन अधिकारी अनिरुध्द राजुरवार, सत्यनारायण बजाज सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष प्रदीप बजाज, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष संजय इंगळे तिगावकर, जिल्हा ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष मिलींद जुनगडे यांची उपस्थिती असणार आहे. दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मराठी लोकगिते, सायंकाळी ५ ते ७ महाराष्ट्राची लोकधारा कार्यक्रम व संध्याकाळी ७ वाजता गझल मुशायरा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता अभिजात मराठी भाषा : एक साहित्यिक प्रवास परिसंवाद, दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत कवी संमेलन, दुपारी ३ वाजता उत्कृष्ट वाचक सत्कार व समारोपीय कार्यक्रम असणार आहे.

शिवव्याख्यानांच्या आयोजनातून राजधानीत शिवजयंती उत्साहात

वृत्तसंस्था ■ नवी दिल्ली



नवी दिल्ली : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त नवी दिल्ली येथे भव्य आणि ऐतिहासिक शिवजयंती सोहळा उत्साहात झाला. या सोहळ्यात खासदार डॉ. अमोल कोल्हे आणि व्याख्याते विशाल गरड यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत तरुणाईला प्रेरणादायी संदेश दिला.

ओल्ड राजेंद्रनगर येथील बढा बाजार रोड येथे काल सायंकाळी उशिरा पार पडलेल्या या सोहळ्याचे आयोजन सरहद, पुणे, जाणता राजे प्रतिष्ठान (दिल्ली) आणि शौर्य स्मारक ट्रस्ट (पानिपत) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने सोहळ्याची सुरुवात झाली.

या कार्यक्रमास खासदार डॉ. अमोल कोल्हे प्रमुख पाहुणे होते. आपल्या भाषणात ते म्हणाले की, शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्रापुरते सीमित नसून संपूर्ण भारतभूमीचे रक्षण करणारे थोर योद्धा होते. शिवरायांच्या दूरदृष्टीमुळे स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात आली. नव्या पिढीने त्यांचा आदर्श घेणे ही काळाची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नाहीत, तर ते एक विचारधारा आहेत. त्यांच्या नेतृत्वाचा आदर्श घेतल्यास देश अधिक सक्षम होईल.'

श्री. गरड यांनी शिवचरित्र या विषयावर प्रभावी व्याख्यान देऊन शिवरायांच्या युद्धनीती, प्रशासन कौशल्य आणि लोककल्याणकारी निर्णयांवर सखोल प्रकाश टाकला. ते म्हणाले, शिवजयंती हा केवळ सण नाही, तर मराठ्यांच्या पराक्रमाची गौरवशाली आठवण आहे. अशा कार्यक्रमांमुळे नव्या पिढीला शिवचरित्राची महती समजेल. दिल्लीसारख्या ठिकाणीही छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रभाव जाणवतो. त्यांच्या विचारांचा प्रसार फक्त महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही, तर तो राष्ट्रीय स्तरावरही प्रभावी ठरला आहे.

माजी राजदूत आणि साहित्यिक डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी संभाजी महाराजांचा आदर्श घेत महाराष्ट्र देशाला कसे योगदान देऊ शकतो, यावर भाष्य केले. ते म्हणाले की, 'छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा मंत्र दिला, तर शाहू महाराज, महात्मा फुले, आगरकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज परिवर्तनासाठी मोलाचे योगदान दिले आहे.'

या सोहळ्यातील मुख्य आकर्षण गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद असलेल्या सिंहगर्जना ढोलताशा पथकाच्या दमदार सादरीकरणाचे होते. त्यांच्या वादनाने संपूर्ण परिसर दुमदुमुन गेला.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे सहसंयोजक लेशपाल जवळगे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. 'जय भवानी, जय शिवाजी'च्या गगनभेदी घोषणांनी आणि ढोल-ताशांच्या निनादात या भव्य सोहळ्याची सांगता झाली.

किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्त्याचे निधी वितरण २४ फेब्रुवारीला पंतप्रधान यांच्या हस्ते वितरण

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : पी. एम. किसान सन्मान निधी योजनेचा माहे डिसेंबर २०२४ ते मार्च २०२५ कालावधीतील १९ वा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते २४ फेब्रुवारी, २०२५ रोजी दुपारी ०२.१५ वा. ते ०२.३० वा. या कालावधीत भागलपूर, बिहार येथील समारंभात वितरीत होणार आहेत. सदर कार्यक्रम देशामध्ये 'किसान सन्मान समारोह' म्हणून सर्वदूर आयोजित करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाने शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न देण्याकरीता प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजना माहे फेब्रुवारी, २०१९ पासून सुरु केली आहे. या योजनेच्या निकषांनुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु. २००० प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी रू. ६००० त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात लाभ जमा करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजने अंतर्गत राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना यापुर्वी एकूण १८ हप्त्यांमध्ये सुमारे रू. ३३ हजार ५६५ कोटीचा लाभ जमा झालेला आहे.

पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी केंद्र शासनाने लाभार्थीने भूमी अभिलेख नोंदणी अद्यावत करणे, बँक खाते आधार संलग्न करणे, ई-केवायसी प्रमाणिकरण करणे या बाबी बंधनकारक केलेल्या आहेत. राज्यातील सद्यस्थितीत या तीनही बाबीची पूर्तता केलेल्या एकूण ९२.८९ लाख शेतकरी कुटुंबांना दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५ रोजी सुमारे रक्कम रुपये १ हजार ९६७ कोटींहून अधिक रक्कमेचा लाभ त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट हस्तांतरणाद्वारे जमा होणार आहे. राज्यातील कृषी विज्ञान केंद्र तसेच जिल्हा, तालुका व ग्राम पंचायत स्तरावर सदरचा समारोह आयोजित करण्यात येत आहे.

सदरहु समारंभाच्या वेळी प्रगतशील शेतकरी कृषि शास्त्रज्ञ, निमंत्रित मान्यवर, तसेच शेतकरी यांच्या उपस्थितीत चर्चासत्र, प्रदर्शने, विविध योजनांची माहिती व लाभ वितरण कार्यक्रमाचा समावेश करण्यात आला आहे. राज्यात वेगाने सुरु असलेल्या अग्रीस्टॅक योजनेंतर्गत शेतकरी माहिती संच तथा फार्मर आयडी बनविण्यासाठीची नोंदणी नागरी सुविधा केंद्रांवरुन करण्यात येत आहे. सदरहु ठिकाणांवरुनही या समारोहाचे थेट प्रक्षेपणामध्ये सहभागी होता येईल.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस समारोहास सातारा येथून सहभागी होणार आहेत. राज्यांमध्ये सर्वदूर कृषि विभाग, महसूल व वने विभाग, ग्राम विकास विभाग तसेच कृषी विज्ञान केंद्र, शेतकरी उत्पादन संघटना यांच्या संयुक्त विद्यमानाने सदरचा समारोह साजरा करण्यात येणार आहे. सदरच्या समारोहाचे थेट प्रक्षेपण केंद्र शासनाच्या https://pmindiawebcast.nic.in या लिंक वरून होणार आहे. सदरच्या लिंकचा वापर करून जास्तीत जास्त शेतकरी बंधु भगिनींनी या समारोहामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

सूनेला पेटवून देणाऱ्या सासू-नणंदेला जन्मठेप

वृत्तसंस्था ■ पुणे



पुणे : स्वयंपाक करण्यावरुन झालेल्या वादातून सुनेला शिवीगाळ, तसेच अंगावर रॉकेल ओतून पेटवून देणाऱ्या सासू आणि नणंदेला अतिरिक्त सत्र न्यायाधीश प्रभाकर जाधव यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. मूत्यूपूर्व जबाब, तसेच साक्ष, पुरावे ग्राह्य धरुन न्यायालयाने सासू आणि नणंदेला दोषी ठरविले.

ममता विजय चव्हाण (वय ४८, रा. श्रमिकनगर, मंगळवार पेठ) आणि रिटा उर्फ गौरी संतोष वाल्मिके (वय ३४, रा. जयजवाननगर) अशी शिक्षा सुनावलेल्यांची नावे आहेत. स्वयंपाक करण्यावरुन झालेल्या वादातून सासू ममता आणि नणंद रिटा यांनी दीपाली अमित चव्हाण (वय २८) हिच्या अंगावर रॉकेल ओतून पेटवून दिल्याची घटना १ नोव्हेंबर २०२३ रोजी घडली होती. गंभीर भाजलेल्या दीपालीला पती अमितने ससून रुग्णालयात दाखल केले होते. त्या वेळी ससून रुग्णालयात फरासखाना पोलीस ठाण्यातील सहायक निरीक्षक परशुराम शिंदे यांनी तिचा वैद्यकीय तज्ज्ञांच्या उपस्थितीत जबाब नोंदवून घेतला होता. उपचारादरम्यान दीपालीचा ३ नोव्हेंबर रोजी ससून रुग्णालयात मृत्यू झाला होता.

त्यानंतर पोलिसांनी सासू ममता आणि नणंद रिटा यांना अटक केली होती. दीपालीचा पेटवून देऊन खून केल्याप्रकरणी फरासखाना पोलिसांनी दोघींविरुद्ध गुन्हा दाखल करुन त्यांना अटक केली होती. या खटल्यात सरकार पक्षाकडून अतिरिक्त सरकारी वकील नामदेव तरळगट्टी यांनी बाजू मांडली. सरकार पक्षाकडून आठ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. साक्ष, तसेच मृत्यूपूर्व जबाब ग्राह्य धरुन आरोपी सासू आणि नणंदेला जन्मठेप आणि २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.


संपादकीय...

त्याने पदर ओढला म्हणून...

पुरस्कार एकनाथ शिंदे यांस शरद पवार यांच्या हस्ते द्यावा असे आयोजकांस वाटले आणि त्यास संबंधितांनी होकार दिला असेल तर त्यात इतरांचा संबंध येतो कोठे?ठाकरे गटाने आपल्या राजकीय रेकॉर्डची 'गद्दार' या शब्दात अडकलेली सुई अलगदपणे सोडवावी आणि पुढच्या लढाईच्या तयारीस लागावे.महाराष्ट्रातील राजकारण सध्याइतके बालिश, बालबुद्धीचे आणि बालककेंद्री कधीच नव्हते. दोन द्यावेत, दोन घ्यावेत आणि झाले गेले विसरून पुढे चालू लागावे असा प्रौढपणा या राज्याने नेहमीच दाखवला. विश्वनाथ प्रताप सिंह यांच्या सरकारास डावे आणि उजवे या दोघांनी सक्रिय पाठिंबा दिला त्याच्या किती तरी आधी महाराष्ट्रात रा. स्व. संघीय आणि समाजवादी असे दोन ध्रुव एकाच सरकारात सहभागी होते. समाजाचे व्यापक हित गुंतलेले असेल तर राजकारणी आपापले वैयक्तिक मतभेद दूर ठेवून एकत्र येत. राजकारणातील मतभेद वैयक्तिक कट्टी-बट्टीच्या पातळीवर कधी उतरले नाहीत. पण अलीकडच्या काळात महाराष्ट्राचे सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अशा सर्वच अंगाने उत्तरायण सुरू असल्याने गो-पट्ट्यातील राजकीय मतभिन्नतेस वैरत्वाकडे नेण्याची तऱ्हा येथेही रुजू लागते की काय असा प्रश्न पडतो. त्याचे ताजे उदाहरण म्हणजे शरद पवार यांच्या हस्ते दिल्लीत माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा झालेला सत्कार आणि त्यानंतर शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाने केलेला थयथयाट. त्याची खरेच गरज होती का आणि असे काही करून आपण आधीच घसरलेला राजकारणाचा स्तर आणखी उतरवतो किंवा काय, याचा विचार संबंधितांनी करायला हवा. तो केला जात नसेल तर त्याबाबत प्रश्न उपस्थित करणे माध्यमांचे कर्तव्य ठरते.कारण यानिमित्ताने जो काही धुरळा उडाला त्यातून राजकीय हवा तेवढी गढूळ झाली. शरद पवार यांच्या हस्ते एकनाथ शिंदे यांचा सत्कार करावा असे आयोजकांस वाटले आणि त्या समारंभास केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे हेही उपस्थित राहिले. हा पुरस्कार महादजी शिंदे यांच्या नावे होता. तो एकनाथ शिंदे यांस शरद पवार यांच्या हस्ते द्यावा असे आयोजकांस वाटले आणि त्यास संबंधितांनी होकार दिला असेल तर त्यात इतरांचा संबंध येतो कोठे? काही वर्षांपूर्वी शरद पवार यांचा भव्य सत्कार नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाला आणि त्याहीआधी पवार यांच्या साठी सोहळ्यास अटलबिहारी वाजपेयी हे मुंबईत उपस्थित राहिले होते. तेव्हा शिवसेनेने आक्षेप घेतल्याचे स्मरत नाही. ''आमचे आणि भाजपचे फाटले आहे; सबब तुम्ही भाजपच्या नेत्यांस भेटू नका'', असे काही उद्धव ठाकरे यांच्या सेनेने अलीकडे शरद पवार यांस सांगितल्याचेही ऐकिवात नाही. दुसऱ्या बाजूने ''भाजपने आमचा पक्ष फोडला, घर फोडले. सबब तुम्ही भाजप नेत्यांस भेटू नका'' अशी गळ उद्धव ठाकरे यांस शरद पवार वा त्यांच्या गटातील कोणी घातल्याचे दिसले नाही. सद्यःस्थितीत पवार यांची राष्ट्रवादी आणि भाजप यांतील संबंध किती सौहार्दाचे आहेत हे उद्धव ठाकरे वा त्यांच्या साजिंद्यास ठाऊक असेलच. असे असतानाही आपल्या आघाडीतील उद्धव ठाकरे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांस कसे काय भेटतात; अशी किरकिर पवार वा त्यांच्या वतीने कोणी केल्याचे दिसले नाही. असे असताना शरद पवार यांच्या हस्ते एकनाथ शिंदे यांचा सत्कार झाला याबद्दल इतके रान उठवण्याचे कारण काय?''एकनाथ शिंदे यांनी सेना फोडली, ते गद्दार आहेत. म्हणून शरद पवारांनी शिंदे यांचा सत्कार करणे चूक'', असे ठाकरे गटाचे म्हणणे दिसते. तार्किकदृष्ट्या तेही अयोग्य. कारण शिंदे यांनी गद्दारी केली असे मानावयाचे असेल तर ते तसे गद्दार फक्त ठाकरे कुटुंबीयांचे ठरतात. ठाकरे कुटुंबाचा कात्रजचा घाट केला म्हणून संपूर्ण महाराष्ट्राशीच गद्दारी झाली असे सर्वांनी का मानावे? आणि दुसरी बाब अशी की ती गद्दारी त्यांनी केली असे गृहीत धरले तरी त्यांच्या पक्षास सलग दोन निवडणुकांत मिळालेल्या विजयाचे काय? आताच्या विधानसभा निवडणुकीतील मतदारांच्या आकडेवारीविषयी विरोधी पक्षीयांस आक्षेप आहेत. पण मग लोकसभा निवडणुकांतील निकालाचे काय? त्या निवडणुकीतही शिंदे यांच्या सेनेस अधिक जागा मिळाल्या. याचा अर्थ महाराष्ट्रातील जनताही आता गद्दारांनाच पाठिंबा देऊ इच्छिते असा मानायचा काय? तसेच याबरोबरीने तिसरा मुद्दा हा शिंदे यांच्याकडे जाऊ इच्छिणाऱ्या वा जाणाऱ्या नेते-कार्यकर्ते यांचा. ठाकरे आणि त्यांचे सवंगडी इतकी घसाफोड करून शिंदे यांच्या नावे गद्दारीचा गजर करत असतानाही, शिंदे मुख्यमंत्री नसतानाही इतक्या जणांस त्यांच्याकडे जावे असे मुळात वाटतेच का? खरा प्रश्न हा आहे. त्यास ठाकरे आणि त्यांच्या साथीदारांनी भिडण्याची अधिक गरज आहे. उगाच गद्दारीच्या नावे गलबला करून आणि हा त्यांना का भेटला, त्याने सत्कार का केला असली किरकिर करून काहीही हाती लागणार नाही. याचा अर्थ शिंदे सेनेत सर्व काही आलबेल आहे आणि तो पक्ष आदर्श राजकारण करतो आहे असा मुळीच नाही. त्या पक्षातील इतक्या नेत्यांचे नाक भाजपने अशा तऱ्हेने दाबलेले आहे की मिळेल ते 'आत' घेण्यासाठी त्यांस तोंड उघडे ठेवण्याखेरीज पर्याय नाही. या पक्षाच्या मंत्र्यांनी पालकमंत्रीपदाबाबत केलेली वक्तव्ये त्या सर्वांस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हिंग लावूनही कसे विचारत नाहीत, हेच दाखवून देणारी आहेत. किंवा ठाकरे गटाचे अमुक खासदार येणार, तमुक आमदार येणार, लवकरच 'ऑपरेशन मशाल' इत्यादी ही मंडळी करत असलेल्या वल्गनादेखील शिंदे गटाचे अनेक मंत्री कसे वजनरहित आहेत हे दाखवून देतात. काही ना काही निमित्ताने आपण चर्चेत, बातम्यांत कसे राहू इतकाच काय तो या सर्वांचा या निरर्थक बडबडीमागचा विचार. त्यांना त्यांचा सहकारी पक्षही गांभीर्याने घेत नाही, हे वास्तव.त्याकडे दुर्लक्ष करून त्या बडबड-बुणग्यांत सामील होण्याचा प्रयत्न ठाकरे यांच्या सेनेने करण्याचे कारण नाही. शरद पवार यांच्या हस्ते शिंदे यांचा सत्कार झाला म्हणून या पक्षाने सुरू केलेले रडगाणे या धर्तीचे होते. त्यात वेळ घालवण्यापेक्षा स्वतःच्या पक्ष बळकटीकडे त्यांनी अधिक लक्ष द्यावे. आपल्याच कोणा नेत्यास गद्दार, गद्दार म्हणत राहिल्याने उलट सेना नेतृत्वाचे अशक्तपण अधोरेखित होते. अन्याय करणाऱ्याइतकाच अन्याय सहन करणाराही दोषी असतो, या उक्तीप्रमाणे गद्दारी (ती झाली असेल तर) करणाऱ्याइतकाच ती करू देणाराही त्यास जबाबदार असतो. हे सत्य लक्षात घेतल्यास ठाकरे गटाने आपल्या राजकीय रेकॉर्डची 'गद्दार' या शब्दात अडकलेली सुई अलगदपणे सोडवावी आणि पुढच्या लढाईच्या तयारीस लागावे. निवडणूक आयोग, सर्वोच्च न्यायालय अशा अनेकांमुळे ठाकरे गटास न्याय मिळाला नाही, हे नाकारता येणार नाही. निवडणूक आयोग नामे यंत्रणेस कणा असता, सर्वोच्च न्यायालय आपला असलेला कणा योग्य वेळी दाखवून देते तर ठाकरे यांच्या शिवसेनेवर आज उद्धवलेली परिस्थिती उद्धवली नसती, हे खरेच. पण आता तो कोळसा उगाळण्यात काही अर्थ नाही. अधिक काळ उगाळला म्हणून कोळसा काळ्याचा पांढरा होत नाही. तेव्हा स्वतःवरील अन्यायाच्या इतिहासात रमणे स्वान्त सुखाय असले तरी तसे करत राहणे आत्मघातकी असते. तेव्हा पुढे चलावे.''त्याने पदर ओढला म्हणून तिने पातळ सोडलेष्ठ'' असे विंदा करंदीकर एका विरूपिकेत लिहितात. राज्याच्या राजकारणाची अशी विरूपिका होणे योग्य नाही. जबाबदारांनी तरी ते टाळायला हवे.

।।। मरेन तर देशासाठी: जगेन तरीही देशासाठीच ।।।

(क्रांतिगुरू लहुजी साळवे पुण्यस्मरण सप्ताह विशेष)



भारतमातेला इंग्रजांपासून वाचविण्यासाठी राघोजी साळवे शहीद झाले. त्याच ठिकाणी क्रांतिवीर लहुजींनी दि.१७ नोव्हेंबर १८१७ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण केली. श्रद्धांजली अर्पण करतानाच त्यांनी 'मरेन तर देशासाठी आणि जगेन तरीही देशासाठीच'अशी क्रांतिकारी प्रतिज्ञाही केली होती. त्यांनी अनेक देशभक्तांना आपल्यातील युद्धकला शिकवली. अशा महान क्रांतिगुरूची महती त्यांच्या स्मृतिदिनी श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी वर्णन करीत आहेत... संपादक.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात लहुजींचे पूर्वज पराक्रम गाजवीत. साळवे घराणे सशस्त्र विद्येमध्ये निपुण व तरबेज होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कार्यकाळात लहूजींच्या पूर्वजांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या कार्यकाळात साळवे घराण्याची योग्यता ओळखून पुरंदर किल्ल्याच्या सरंक्षणाची जबाबदारी लहुजी साळवे यांच्या आजोबांकडे सोपवली होती. पुरंदर किल्ल्याच्या सरंक्षणासाठी साळवे घराण्यातील अनेक वीरपुरुषांनी आपल्या प्राणांची आहुती दिली होती. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरींमुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी लहुजींच्या पूर्वजांना राऊत या पदवीने गौरविले होते.



संकलन व सुलेखन - श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी. रामनगर वॉर्ड, गडचिरोली. फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

वस्ताद लहुजी राघोजी साळवे हे खरेतर लहुजी वस्ताद नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म दि.१४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावातील एका कुटुंबात झाला. मातंग समाजात जन्माला आलेल्या लहूजींना युद्धकलेचे प्रशिक्षण त्यांच्या घरातील वीर पुरुषांकडून मिळाले होते. लहूजींच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे व आईचे नाव विठाबाई होते. लहूजी साळवे यांचे वडील राघोजी साळवे अतिशय पराकर्मी पुरुष होते. युद्ध कलेमध्ये त्यांचा कोणीही हात धरू शकत नसे. वाघाबरोबर लढाई करण्याच्या पराक्रमामुळे लहुजी साळवे यांचे वडील राघोजी साळवे त्याकाळी प्रसिद्ध होते. एकदा त्यांनी वाघाबरोबर युद्ध केले आणि जिवंत वाघाला खांद्यावर घेऊन पेशव्यांच्या राजदरबारी सादर केले होते. असे त्यांनी आपल्या प्रचंड शक्तीचे प्रदर्शन केले होते.

पुढे दि.५ नोव्हेंबर १८१७ला पेशव्यांचे इंग्रजांसोबत खडकी येथे तुंबळ युद्ध झाले. तब्बल १२ दिवसांपर्यंत राघोजी व २३ वर्षे वयाच्या लहुजी यांनी आपल्या मावळ्यांना सोबत घेऊन इंग्रजांविरुद्ध निकराचा लढा दिला. लहुजींचे वडील राघोजी साळवे वाऱ्याच्या वेगाप्रमाणे शत्रूवर तुटून पडले होते. ते तलवारीचे सपासप वार करत शत्रुंना जमिनीवर लोळवत होते. अखेर या संकटातून बाहेर पडण्यासाठी घाबरलेल्या इंग्रजांनी एकत्रित वार करून राघोजींना धारातीर्थी पाडले. राघोजी या युद्धात इंग्रजांच्या हातून लहुजींच्या समोरच शहीद झाले. त्यावेळी पेशव्यांचा पराभव झाला. पुढे इ.स.१८१८मध्ये मराठा साम्राज्याचा भगवा ध्वज शनिवारवाड्यावरून हटवून तेथे इंग्रजांचा युनियन जॅक फडकला. या पराभवाने लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्यप्राप्तीची ज्वाला भडकली. स्वातंत्र्यप्रेम, देशभक्ती, देशप्रेम यांनी झपाटलेले लहुजी आपल्या वडिलांच्या मृत्यूच्या दुःखातून सावरले. आपल्या वडिलांना आपल्या डोळ्या देखतच शहीद झालेले पाहून त्यांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. भारतमातेला इंग्रजांपासून वाचविण्यासाठी राघोजी साळवे शहीद झाले. त्याच ठिकाणी क्रांतिवीर लहूजींनी दि.१७ नोव्हेंबर १८१७ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण केली. श्रद्धांजली अर्पण करतानाच त्यांनी 'मरेन तर देशासाठी आणि जगेन तरीही देशासाठी' अशी क्रांतिकारी प्रतिज्ञाही केली होती. त्यांनी आपल्या वडिलांची समाधी उभारली. ही समाधी अजूनही पुणे-शिवाजी नगरजवळच्या वाकडेवाडी येथे आहे.

क्रांतिगुरू लहुजी हे दांडपट्टा चालवणे, तलवारबाजी, घोडेस्वारी, बंदूक चालवणे व निशाणेबाजी अशा सर्व युद्धकला कौशल्यांमध्ये निपुण होते. त्यांचे पिळदार शरीर व उभरलेली छाती पाहून शत्रूला सुद्धा घाम फुटत असे. जीवघेण्या शस्त्रांबरोबर ते अगदी एखाद्या खेळण्याप्रमाणे खेळत असत. आपल्या वडिलांचा मृत्यू व इंग्रजांनी केलेला पराभव त्यांना असह्य झाला. पराक्रमी घराण्यातील लहुजींनी इंग्रजांवर मात करण्यासाठी म्हणजे पर्यायाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी मवाळपंथी नव्हे तर जहाल क्रांतिकारक निर्माण करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी आपल्या अंगी असलेले युद्धकलेचे शिक्षण तरुणांना देण्याचे ठरविले. म्हणून त्यांनी इ.स.१८२२मध्ये पुण्यातील रास्ता पेठ येथे देशातील पहिले युद्ध कलाकौशल्य तालीमकेंद्र उघडले. ते नाना रास्ते सरदार यांच्या हस्ते सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्वच समाजांतील युवक तालीम घेण्यासाठी येऊ लागले. यात प्रामुख्याने बाळ गंगाधर टिळक, वासुदेव बळवंत फडके, महात्मा जोतीराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, चापेकर बंधू, क्रांतिभाऊ खरे, क्रांतिवीर नाना दरबारे, रावबहादूर सदाशिवराव गोवंडे, नाना मोरोजी, क्रांतिवीर मोरो विठ्ठल बाळवेकर, क्रांतिवीर नाना छत्रे, महात्मा जोतीराव फुलेंचे सहकारी वाळवेकर आणि परांजपे हे देखील लहुजी साळवे यांच्या आखाड्यातच शिकले. इ.स.१८४८ साली लहुजींच्या याच तालमीत सावित्रीमाई फुले यांची पहिली मुलींची शाळा सुरू झाली होती. म्हणून ते आद्य महाक्रांतिगुरू ठरतात, यात मुळीच शंका नाही.

दि.२० जुलै १८७९ रोजी इंग्रजांनी वासुदेव बळवंत फडके यांना देवरनावडगा मुक्कामी रात्री झोपेत असताना पकडले व त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. दि.७ नोव्हेंबर १८७९ रोजी वासुदेव फडके यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. हे ऐकून लहुजींच्या मनावर खूप मोठा आघात झाला. अवघ्या तेरा महिन्यांनी म्हणजेच दि.१७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्याच्या संगमपुराच्या परिसरात एका झोपडीवजा घरामध्ये लहुजी साळवेजींची प्राणज्योत मालवली. त्याबरोबरच एका महा क्रांतिपर्वाचा शेवट झाला. त्यांची समाधी पुण्यातील संगमवाडी येथे आहे.

!! आद्य महाक्रांतिगुरु लहुजींना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !!

परिक्षा...

मनापासून हवी ना
कॉपी मुक्त परिक्षा
विचारप्रश्न स्वतास
नकोवाझोटअपेक्षा

परिक्षकां द्याअभय
गरजे नुसार सुरक्षा
साधने नवी आयुधे
सक्षम हो परिवेक्षा

कॉपी उद्युक्त संस्था
करावी जबरीशिक्षा
विद्यार्थ्यांकडे उगा
ना भारंभार अपेक्षा

सहज गाठेलंलक्ष्या
व्यापक ठेवा कक्षा
सारे अव्वलअशक्य
नको कराया उपेक्षा

भय बडगा शिक्षेचा
समालोचन त्यापेक्षा
कुवत असे भिन्न ती
का मोठ्या आकांक्षा

समुपदेशन जरुरीचे
तशीच मिळो दिक्षा
छात्रा द्यावे हक्काचे
नकोफुकटात भिक्षा

नितळ निर्लेप व्हावी
छात्रगणांची समिक्षा
चमकतीलं खरे तारे
प्रगतीच्या अंतरिक्षा

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

कॉपीचा...

परिक्षा
मौसम येता
कॉपीचा सुळसुळाट
उत्तीर्ण होण्या साठी
धुक्यात विरली वाट

नवनवीन आयडिया
किती मिळे पळवाट
अभ्यास करुन पास
रे बिघडली वहिवाट

तयार आयुधे घेऊन
हुशार कॉपी सम्राट
शोधती विभीन्न रस्ते
आयडिया त्या विराट

भरारी पथक अथक
परिक्रमा करती ताठ
अपाय करती ज्यादा
रे उपाय सत्राशे साठ

हुशार विद्यार्थी सुध्दा
अभ्यासा दाखवे पाठ
रेडीमेड मिळे सगळे
का करायचे तोंडपाठ

अभ्यासा राहून व्यग्र
का दुखवून घेऊ पाठ
स्पेशलकोचींगक्लास
नवी फेसाळती लाट

कॉपीवर हवा वचक
बंद व्हावे गाडे रहाट
काळरात्र येईल पुन्हा
उगवण्याआधी पहाट

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

धर्मपाल यांनी भारताचे स्वत्व ओळखण्याचे काम केले: प्रो. हनुमानप्रसाद शुक्ल

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या दूरस्थ शिक्षण निदेशालया द्वारे श्री धर्मपाल स्मृती व्याख्यानमालेच्या उद्घाटन कार्यक्रमाची अध्यक्षता करतांना कुलगुरू प्रो. हनुमानप्रसाद शुक्ल म्हणाले की धर्मपाल यांनी भारताची ओळख पटवण्याचे महत्त्वाचे काम केले. त्यांना शेवटच्या श्वासापर्यंत भारताचे भविष्य घडवण्याची चिंता होती. ते महात्मा गांधींच्या शाश्वत भारताच्या संकल्पनेचे प्रचारक होते. त्यांनी अनेक महत्त्वाचे लेखन केले आणि भारत समजून घेण्यासाठी अंतर्दृष्टी प्रदान केली.

या प्रसंगी साहित्य विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. अवधेश कुमार, मानविकी व सामाजिक विज्ञान विद्यापीठाचे अधिष्ठाता फरहद मलिक, शिक्षण विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. गोपाल कृष्ण ठाकुर आणि विधी विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. जनार्दन कुमार तिवारी यांनी धर्मपाल यांच्या कार्यावर आणि त्यांच्या जीवन तत्वज्ञानावर प्रकाश टाकला. प्रो. अवधेश कुमार म्हणाले की धर्मपाल यांनी भारताच्या मूलभूत परंपरेला आत्मसात केले आणि स्वदेशी शिक्षण आणि सर्वोदयाच्या भावनेने महात्मा गांधींचे अनुसरण केले. प्रो. फरहद मलिक म्हणाले की धर्मपाल यांनी भारतीय ज्ञान परंपरेला भारतीय शिक्षण धोरणात समाविष्ट करण्याचे काम केले. प्रो. गोपाल कृष्ण ठाकुर म्हणाले की भारतीय ज्ञान परंपरेबाबत खोट्या मिथकांची निर्मिती करण्यात आली आहे ज्यामुळे भारताच्या प्राचीन ज्ञान परंपरेबद्दलचे सत्य समोर आले नाही. धर्मपाल यांनी पंचायती राजवर लिहिलेल्या पुस्तकाचा उल्लेख करताना प्रो. जनार्दन कुमार तिवारी म्हटले की स्वातंत्र्यापूर्वीही भारतात पंचायती राज व्यवस्था अस्तित्वात होती.

स्वागत भाषण व विषय प्रवर्तन करतांना दूरस्थ शिक्षण निदेशालयाचे निदेशक प्रो. आनन्द पाटील म्हणाले की धर्मपाल यांचे कार्य तरुण पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी व्याख्यानांची मालिका आयोजित केली जात आहे. धर्मपाल यांनी ब्रिटन आणि भारतभर ३० वर्षांहून अधिक काळ प्रवास केला आणि भारताला जाणून आणि समजून घेण्याचा भारतीय दृष्टिकोन दिला. त्यांनी सांगितले की या व्याख्यानमालेअंतर्गत दरमहा एक व्याख्यान होईल आणि बारा व्याख्यानांच्या मालिकेवर एक पुस्तक तयार केले जाईल.

कार्यक्रमाचे संचालन असोशिएट प्रोफेसर डॉ. शंभू जोशी यांनी केले तर डॉ. अमरेंद्र कुमार शर्मा यांनी आभार मानले. प्रारंभी पंडित मदन मोहन मालवीय यांच्या प्रतिमेला आणि श्री धर्मपाल यांच्या छायाचित्राला पुष्पांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्ज्वलन आणि कुलगीताने झाली तर सांगता राष्ट्रगीताने झाली.

कार्यक्रमात शिक्षक, शोधार्थी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिंदी विश्वविद्यालयात नागपूर विश्वविद्यालयातील विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा



वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विश्वविद्यालयाच्या पदव्युत्तर गांधीवादी विचार विभागातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी मंगळवार, १८ फेब्रुवारी रोजी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाला शैक्षणिक भेट दिली. अभ्यास दौऱ्यात नागपूर विश्वविद्यालयाचे एम.ए. गांधीवादी विचार विभागाचे प्रमुख प्रो. प्रमोद वाटकर, अध्यापक डॉ. अपरूप अडावदकर, डॉ. गणेश ढोबळे, प्रो. शिलादित्य सिंह, डॉ. सुनिता चौरासिया, प्रो. धम्मप्रकाश वैद्य, प्रो. कीर्ती कालसर्पे, प्रो. पोर्णिमा वानखडे, सर्वोदय आश्रम नागपूरचे अरूण रामकृष्ण देशपांडे यांच्या सह विद्यार्थ्यांनी गांधी हिल्सला भेट दिली आणि सर्वधर्म प्रार्थना केली. त्यांच्या स्वागतासाठी महादेवी वर्मा सभागृहात एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्यांना विश्वविद्यालयाच्या शैक्षणिक आणि विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली.

या प्रसंगी साहित्य विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. अवधेश कुमार, संस्कृति विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता आणि गांधी एवं शांती अध्ययन विभागाचे माजी अध्यक्ष प्रो. नृपेन्द्र प्रसाद मोदी, गांधी व शांती अध्ययन विभागाचे अध्यक्ष डॉ. राकेश मिश्र, साहित्य विद्यापीठाचे डॉ. उमेश कुमार सिंह, माजी छात्र पद्माकर बाविस्कर उपस्थित होते.

आज दहावीची परीक्षा, १६ लाख ११ हजार ६१० विद्यार्थी परीक्षा देणार

वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या माध्यमांतून राज्यभरात उद्या २१ फेब्रुवारी २०२५ पासून दहावीची परीक्षा सुरू होत आहे. तर परीक्षेला १६ लाख ११ हजार ६१० विद्यार्थी बसले आहेत. तर यामध्ये ८ लाख ६४ हजार १२० मुले, ७ लाख ४७ हजार ४७१ मुली, तर १९ ट्रान्सजेंडर परीक्षा देणार आहेत. अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत दिली. तर २३ हजार ४९२ माध्यमिक शाळांमधून विद्यार्थ्यांची नोंदणी केली आहे. तर ५ हजार १३० मुख्य केंद्रांवर परीक्षा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी शरद गोसावी म्हणाले, 'उद्या होणाऱ्या दहावीच्या परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून राज्यातील ७०१ केंद्रांतील संपूर्ण स्टाफ बदलण्यात आला आहे. त्यामध्ये पुणे १३९, नाशिक ९३, नागपूर ८६, मुंबई १८, कोल्हापूर ५४, लातूर ५९ या विभागाचा समावेश करण्यात आला आहे. तर राज्यातील परीक्षा केंद्रावर जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेराद्वारे निगराणी राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

निवृत्तीवेतनधारकांना जीपीएफ खात्यातील शिल्लक आणि इतर तपशील आता ऑनलाइन पाहण्याची सुविधा

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतन धारकांना जीपीएफ खात्यातील शिल्लक आणि इतर तपशील आता ऑनलाइन पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रधान महालेखापाल कार्यालयाच्या पूर्ळे://ईू.दन.र्ही/ा/ईुर्ळे/ाह या अधिकृत संकेतस्थळावर ही सुविधा उपलब्ध असल्याची माहिती प्रधान महालेखापाल जया भगत यांनी दिली.

या सुविधेमुळे महाराष्ट्र राज्य सरकारच्या विदर्भ आणि मराठवाडा प्रांतातील निवृत्तीवेतनधारक आणि सामान्य भविष्य निर्वाह निधी (जीपीएफ) अभिदात्यांना याचा लाभ घेता येईल. याचबरोबर सामान्य भविष्य निर्वाह निधीच्या जी.पी.एफ. स्लिप्स सहजपणे डाउनलोड करू शकतील. गत ५ वर्षांच्या जीपीएफ स्लिप्स देखील ऑनलाइन उपलब्ध असल्याचे नमूद केले आहे.

ही सेवा वापरण्यासाठी, जी.पी.एफ. अभिदात्यांनी प्रधान महालेखापाल कार्यालयाच्या वेबसाइटवर जी.पी.एफ. टॅबखालील 'जी.पी.एफ. तपशील' विभागाला भेट द्यावी. त्यांची लॉगिन प्रमाणपत्रे प्रविष्ट करावी आणि अद्ययावत जी.पी.एफ. शिल्लक आणि गहाळ क्रेडिट (पत) तपशील मिळवावा. क्रेडीटमधे काही विसंगती आढळल्यास, अभिदाता पुढील प्रक्रियेसाठी आवश्यक तपशील प्रधान महालेखापालांच्या कार्यालयात अपलोड करू शकतो असे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

अंतिम पेन्शन प्रकरणांचा तपशील ऑनलाइन पाहण्याची सुविधा पेन्शनधारकांना अंतिम पेन्शन प्रकरणांची माहिती ऑनलाइन सुविधाद्वारे आता घेता येईल. पेन्शन प्रकरणे अंतिम केल्यानंतर, प्रधान महालेखापाल कार्यालय संबंधित पेन्शन मंजुरी अधिकारी/आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांना आपल्या पत्रांसह सेवापुस्तिका पाठवते. या बाबतची माहिती आता कार्यालयाच्या वेबसाइटवर उपलब्ध असेल. यात गत तीन महिन्यांसह चालू महिन्यात अंतिम झालेल्या पेन्शन प्रकरणांची माहिती कार्यालयाच्या वेबसाइटवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे प्रक्रिया सुलभ होण्यासह पारदर्शकता वाढली आहे.

महाराष्ट्र राज्यातील कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांना कार्यक्षम आणि पारदर्शक सेवा पुरवण्यासाठी नागपूरच्या प्रधान महालेखापालांद्वारा सुरू असलेल्या प्रयत्नांचा हा एक भाग आहे. अधिक माहितीसाठी कृपया कार्यालयाच्या अधिकृत वेबसाईटवर भेट द्या, असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

'जय भवानी जय शिवाजी' च्या गजरात ब्ल्यु डायमंड स्कूलमध्ये शिवजयंती साजरी

लोणंद ■ मंगेश माने



लोणंद : जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव, अशा प्रेरणादायी घोषणा देत लोणंद (ता. खंडाळा) येथील ब्ल्यु डायमंड इंग्लिश मिडीअम स्कूल मध्ये हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. हा अनोखा उपक्रम संपन्न होत असताना सुरुवातीला शाळेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री. जगन्नाथ शेंडगे सर आणि शाळेतील वाहन चालक तसेच शिक्षकवृंद यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करीत अभिवादन करण्यात आले. विद्यालयातून मिरवणूकीस प्रारंभ करण्यात आला. ही मिरवणूक लोणंद शहरातून घेऊन जात असताना एक शिवमय माहोल झालेला पाहायला मिळाला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सारखी वेशभूषा साकारलेला इयत्ता आठवीतील प्रतिक लकडे हा विद्यार्थी विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला होता. रयतेच्या राजाचे स्वरूप अगदी राजेशाही थाटातच करण्यात

आले होते. हुबेहुब शिवराय बनलेल्या

विद्यार्थ्याला घोड्यावर स्वार करत ज्या पद्धतीने शिवजयंतीची मिरवणूक

काढण्यात आली होती. जणू हा सोहळा अनेकांच्या डोळ्याना प्रत्यक्ष अनुभवता आला. याबद्दल सुद्धा लोणंदकरांनी सुध्दा ब्ल्यु डायमंड स्कूलच्या या आयोजनाचे व सर्व विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केलेले आहे. अनेक विद्यार्थ्यांनी भगवे झेंडे घेऊन व कुडते घालून मिरवणूक सोहळ्यात एक नयन रम्य असे दृश्य निर्माण केलेले पाहायला मिळाले. संपूर्ण लोणंद शहरातून जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव असा जयघोष देण्यात आल्याने विद्यार्थ्यांना सुद्धा एका वेगळ्या उपक्रमाची अनुभूती घेता आली. मिरवणूक लोणंद नगरपंचायत पटांगणात आल्यानंतर विद्यार्थ्यांकडून विविध उपक्रम घेण्यात आले. यावेळी शिव विचारांचा आणि शिवकार्याचा जागर करण्यात आला. सुरुवातीला प्रास्ताविक विद्यालयातील विद्यार्थी प्रतिनिधी श्रेया धायगुडे व विवेक भुजबळ या विद्यार्थ्यांनी केले. संध्या धायगुडे या विद्यार्थीनीने छत्रपती शिवाजी महाराजांना शिवगर्जनेतून मानवंदना दिली. विद्यार्थ्यांनी दैवत छत्रपती या गाण्यावर लेझिम नृत्याचे सादरीकरण सुद्धा करण्यात आले. इयत्ता सातवीतील विद्यार्थीनी श्रद्धा देवकर हिने शिवकाव्य म्हटले. तर इयत्ता तीसरी तील विद्यार्थी अथर्व बिचुकले याने पोवाडा गायन केले. मिरवणुकी दरम्यान सर्व वाहन चालक तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या आयोजना बद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री. जगन्नाथ शेंडगे सर, उपाध्यक्षा सौ. सुरेखा शेंडगे सर, मुख्याध्यापिका सौ. हेमलता दिक्षित मॅडम, खजिनदार सौ. शुभांगी धसाडे मॅडम, समन्वयक श्री. दत्तात्रय पवार सर, व्यवस्थापक श्री. अजिंक्य भोसले सर. आदींनी सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले. छत्रपती शिवाजी महाराज होते म्हणून आपण आहोत. स्वराज्य म्हणजे काय असते ? याचा आदर्श छत्रपती शिवाजी महाराजांनी जगाला दाखवून दिलेला आहे. शिवाजी राजे एक आदर्श व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा जयंती उत्सव हा आपल्या महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा झाला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य व विचार लोकांपर्यंत पोहचले पाहिजे. म्हणून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शिवकार्याचा जागर करण्याचा हा प्रयत्न होता. असे शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री जगन्नाथ शेंडगे सर यांनी म्हटले आहे.

बोरी खुर्द येथे १२ कॉपी बहाद्दरावर रेस्टिकेटची कार्यवाही; जिल्हास्तरीय पथकाची कामगिरी : कॉपीमुक्ती अभियानला केराची टोपली

कंधार ■ संतोष कांबळे

कंधारः तालुक्यातील बोरी खुर्द येथील बालाजी ज्युनिअर कॉलेज मध्ये बारावीच्या परीक्षेला नकलांचा सुळसुळाट सुरू असल्याचा प्रकार गुरुवारी दि. २० फेब्रुवारी रोजी समोर आला. उपशिक्षणाधिकारी संतोष शेटकार यांनी कॉलेजला भेट दिली असता १२ विद्यार्थी नकल करताना आढळले. या नकल बहाद्दरावर कारवाई करण्यात आल्याची माहिती शेटकार यांनी दिली.

बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात घेण्याचा संकल्प जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सोडला होता. त्या अनुषंगाने प्रशासनाने नियोजन केले आहे. कॉपीमुक्ती अभियानामुळे विद्यार्थ्यांनी धसका घेतल्याचे चित्र आहे. परंतू काही ठिकाणी कॉपीमुक्त अभियान पूर्णपणे राबविले जात असताना काही शाळा मध्ये सर्रास कॉप्या सुरू आहेत. अशावेळी भरारी पथक हिट लिस्टवर असलेल्या शाळांवर फोकस करून पाठ थोपटून घेत आहे.

गुरुवारी रसायनशास्त्राचा पेपर होता. जिल्हास्तरीय पथक प्रमुख प्राथमिक उप शिक्षणाधिकारी संतोष शेटकार यांनी बोरी खुर्द येथील बालाजी ज्युनिअर कॉलेजला भेट दिली असता १२ विद्यार्थ्यांना कॉपी करताना आढळले. या सर्व कॉपी बहाद्दरांचे उत्तर पत्रिका जप्त करून त्यांच्यावर रेस्टिकेटची कारवाई करण्यात आली. या प्रकारामुळे कॉपीमुक्त अभियानाला शाळांनी केराची दाखवल्याने चव्हाट्यावर आले आहे.

आर आर पाटील स्मार्ट ग्राम पुरस्कारासाठी कोर्टा व बोरीसावंत या ग्रामपंचायतीची पथकाद्वारे तपासणी

हिंगोली ■ रुपेश एंगडे




हिंगोली : वसमत तालुक्यातील आर आर पाटील स्मार्ट ग्राम पुरस्कारासाठी कोर्टा व बोरी सावंत या ग्रामपंचायतीने सहभाग नोंदवला होता त्यामुळे अंतर तपासणी म्हणून कळमनुरीचे गटविकास अधिकारी श्री प्रदीप बोंढारे तसेच विस्तार अधिकारी विकास पाईकराव बी व्हीं झरकर श्री बोंबले एस एम भुकै यांच्या पथकाने दोन्ही गावांची पाहणी करून रेकॉर्ड तपासणी केली तसेच वैयक्तिक स्वच्छता सार्वजनिक स्वच्छता सांडपाणी व्यवस्थापन, पाणी गुणवत्ता, संगणक प्रणालीचा वापर, माहिती तंत्रज्ञान, बचत गटांच्या सुविधा, शालेय व अंगणवाडी स्तरावर असलेली स्वच्छता, कर वसुली, यासह इतर असणाऱ्या निकषाची तपासणी केली.

तसेच पंचायत समिती वसमत येथील गटविकास अधिकारी उमाकांत तोटावाड यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीने केलेल्या विकास कामाबाबत समाधान व्यक्त केले या तपासणी दरम्यान वसमत येथील पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री डि एन गुट्टेवार गट समन्वय बि सी खंदारे, प्रकाश दवने यांच्यासह कोर्टा येथिल सरपंच रामकिशन भोकरे उपसरपंच गोदावरी आव्हाड ग्राम पंचायत अधिकारी एयु चाटनकर व बोरी सावंत येथील सरपंच राजेश सावंत उपसरपंच तुकाराम सावंत ग्राम पंचायत अधिकारी आर के चव्हाण तसेच ग्राम पंचायत कर्मचारी मुंजाजी सावंत, कोर्टा येथील ग्राम पंचायत कर्मचारी शामराव साबळे अंगणवाडी सेविका, बचत गट प्रतिनिधी, जलसुरक्षक, रोजगार सेवक, आशा स्वयसेविका, ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

शिरूर येथील प्राथमिक शिक्षकांचे क्रिकेट सामने उत्साहात संपन्न

शिरुर (पुणे) ■ प्रतिनिधी



पुणेः शिरूर टीचर्स क्रिकेट प्रीमियर लीग च्या माध्यमातून शिरूर तालुका पदवीधर, प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेच्या वतीने क्रिकेट स्पर्धेचे आयोजन रामलिंग स्टेडियम, शिरूर येथे करण्यात आले होते.

शिक्षक सक्षमीकरणाचे प्रेरणा स्रोत सन्माननीय श्री. संजयजी नाईकडे साहेब यांच्या प्रेरणेतून स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शिरूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सन्माननीय श्री. महेश डोके साहेब गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर साहेब आणि रामलिंग शिरूर येथील महाराष्ट्र महिला क्रिकेट टीमचं प्रतिनिधित्व करत असणाऱ्या आरती दसगुडे यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या क्रिकेट स्पर्धेमध्ये शिरूर तालुक्यातील एकूण बारा संघ सहभागी झाले होते. तालुक्याच्या विविध भागातून बिटवाईज संघ तयार करण्यात आले होते. त्यामध्ये एक पंचायत समिती कर्मचारी यांचा एक संघ होता .या संघामध्ये गटविकास अधिकारी सन्माननीय महेश डोके साहेब आणि कळमकर साहेब यांनी सुरुवातीला फलंदाजी करत आपल्या संघाला आणि शिक्षक क्रीडापटूंना एक आदर्श घालून दिला .अतिशय अटातटीचे सामने पार पडले अशी माहिती स्पर्धेचे आयोजक व पदवीधर संघटनेचे तालुकाध्यक्षअध्यक्ष कल्याणराव कोकाटे सर यांनी दिली.

या स्पर्धेमध्ये सरदवाडी बीट (पुरंदर स्ट्रायकर्स)-प्रथम क्रमांक न्हवरे बीट (प्रतापगड वॉरियर्स) -- द्वितीय क्रमांक शिरूर नगरपालिका संघ(रामशेज वॉरियर्स)- तृतीय क्रमांक आणि चतुर्थ क्रमांक तळेगाव बीट (राजगड रॉयल्स) यांनी पटकावला. मॅन ऑफ द सिरीजचा मान- सचिन खेडकर सर यांना मिळाला. तर उत्कृष्ट बॅट्समन- जालिंदर मोहिते सर आणि उत्कृष्ट गोलंदाज- दत्ता चोरे सर यांनी मिळवला.

अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात तीन दिवसाच्या या स्पर्धा पार पडल्या यासाठी सर्व खेळाडू आणि पदवीधर संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी कष्ट घेतल्याचे राज्याध्यक्ष अनिलराव पलांडे यांनी सांगितले. तालुक्यातील सर्व शिक्षकांनी प्रत्यक्ष अथवा ब्दलूंच्या माध्यमातून रंगतदार सामने पाहण्याचा आनंद लुटला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या दिवशी अंतिम सामना पार पडल्याने महाराजांची आरती घेऊन पूजन करून जय जयकार करून विजय संघांना बक्षीस वितरण करण्यात आले. या स्पर्धेसाठी अनेक शिक्षकांनी सौजन्य रुपी सहकार्य केले. तसेच सर्व खेळाडू संघटनेचे सर्व आजी-माजी पदाधिकारी या सर्वांचे सहकार्य लाभले.

हयातनगर येथिल पंचशिल ध्वज काढून टाकल्यामुळे नागरिकांचे अमरण उपोषण



हिंगोली ■ रुपेश एंगडे

हिंगोली : वसमत तालुक्यातील हयातनगर या गावांमध्ये दिनांक ११ जानेवारीला गावातील सरपंच, उपसरपंच यांचे पती यांनी कोणतीही लेखी व तोंडी सूचना न देता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत असलेला पंचशील ध्वज जेसीबीच्या साह्याने काढून टाकला आहे. सदर झेंडा गावठाण मध्ये नसताना कोणत्या अधिकारातून काढला हे कळायला मार्ग नाही. या प्रकारामुळे बौद्ध समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. हे कृत्य करणाऱ्यावर ऑट्रासिटी अंतर्गत गुन्हे दाखल करावे व ध्वज त्याच ठिकाणी उभारावा या मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी कार्यालयात देऊन त्याच कार्यालयासमोर बौद्ध समाजाचे महिला व बांधव हे तिन दिवसापासून अमरण उपोषण करत आहेत. प्रशासनाने या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन बौद्ध समाजाचे प्रश्न सोडवण्याची आवश्यकता आहे.

ऑल इंडिया एससी एसटी रेल्वे एम्प्लॉईज असोसिएशन औरंगाबाद शाखा यांच्यातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ जयंती अतिशय उत्साहात आनंदात साजरी



परभणी ■ अरविंद कांबळे

छत्रपती संभाजीनगर,. संभाजी नगर, येथे ऑल इंडिया रेल्वे एससी एसटी रेल्वे एम्पलॉइज असोसिएशन छत्रपती संभाजीनगर कार्यालय येथे आज छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती आनंदा साजरी करण्यात आली.

यावेळी छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकाचे स्टेशन प्रबंधक , सुनिल बिरार साहेब तसेच संयुक्त रनिंग लॉबी चे मुख्य क्रु नियंत्रक जी व्ही गोरे साहेब हे उपस्थित होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. नंतर मिठाई वाटप करून जयंती साजरी करण्यात आली.

शाखा सचिव विशांत जाधव कोषाध्यक्ष महेंद्र जाधव संघटन सचिव गोरख भालेराव यांच्या सह पदाधिकारी सदस्यगण व रेल्वे कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

पळशी ग्रामपंचायतने केलेल्या कामाच्या चौकशीसाठी आमरण उपोषण



हिंगोली ■ रुपेश एंगडे

हिंगोली : वसमत तालुक्यातील पळशी ग्रामपंचायत अंतर्गत विविध विकास कामासाठी लाखो रुपयांचा निधी प्राप्त होत असतो. परंतु त्याचा योग्य वापर न करता अपव्यय केला जातो. यामध्ये घनकचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा योजना, १४ वा व १५ वा वित्त आयोगातील वर्गीकृत निधीचा त्या प्रमाणात योग्य वापर केला जात नाही तसेच विविध योजनेतून मिळणारे घरकुल ते काही लाभार्थींना परत परत मिळत आहेत. परंतु खरे लाभार्थी अजूनही वंचित आहेत. म्हणून याची चौकशी करून संबंधितावर गुन्हे दाखल करण्याच्या मागणी केली आहे. अशा अशयाची तक्रार मिलिंद जमदाडे यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती वसमत यांना दिली आहे. आणि दिनांक २० फेब्रुवारीपासून आमरण उपोषण चालू केले आहे. या उपोषणाची दखल गटविकास अधिकारी घेऊन चौकशी करतात का? याकडे सर्व जनतेचे लक्ष लागले आहे.

जय भवानी जय शिवाजी'च्या घोषणांनी कंधार परिसर दणाणला शिवजयंतीनिमित्त कंधार शहरात भव्य मिरवणूक

कंधार ■ संतोष कांबळे





कंधारः कंधार शहरात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीतर्फे ढोलताशांच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीत महिला, पुरुष व तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी परिसर दणाणला होता.

सकाळी ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा दुग्धाभिषेक करण्यात आला. सकाळी ११ वाजता छ. संभाजी महाराज स्मारक, कंधार येथून भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात आली. यानंतर सायंकाळी ६ वाजता बालाजी मंदिर, भवानीनगर, कंधार येथून ढोलताशांच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याच्या भव्य मिरवणूकीस सुरुवात झाली. बसस्थानक, पंचायत समिती कार्यालय, महाराणा प्रताप चौक, तहसील कार्यालय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर, साठेनगर, गांधी चौक, सराफा बाजार मार्गान मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे करण्यात आला. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात

आली. या मिरवणूकीत महिला, पुरुष व तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी परिसर दणाणला होता. तसेच भगव्या झेंड्यांनी सारा परिसर उजळून निघाला होता.

छत्रपती शिवरायांचा जिवंत देखावा, छत्रपती शिवरायांचा अश्वारुढ पुतळा, रथ, घोडे, बँड, बँजो, हलगी पथक, कमानी, रोषणाई या देखाव्यांनी कंधाकरांचे लक्ष वेधले होते. या वेळी काँग्रेस, एमआरएस, भाजप, शिवसेना आदी राजकीय पक्षासह अभिवक्ता संघ, कंधार आगार विविध पक्षाकडून छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या मिरवणुकीत लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, धनराज लुंगारे, मनोहर पाटील भोसीकर, चित्राताई लुंगारे, मधुकर डांगे, स्वप्निल लुंगारे, किशनराव डफडे, संजय देशमुख, सुधाकर कौसल्ये, बालाजी डफडे, नामदेव कुट्टे, चेतन केंद्रे , परमेश्वर जाधव , संदीप तोंडचिरे यांच्यासह शिवप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

मंचर येथे शरद बँकेचा स्नेह मेळावा संपन्न

आंबेगाव ■ संतोष गावडे




आंबेगावः शरद बँकेचा सर्व सेवक प्रशिक्षण कार्यक्रम व स्नेह मेळावा संपन्न झाला यावेळी संस्कार फाउंडेशन चे संस्थापक अजय घुले यांच्या वतीने शरद बँकेचे सी.ओ राजेंद्र देशमुख यांचा माजी आमदार सहकार महर्षी दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील सहकार भूषण पुरस्काराने गौरव करण्यात आला.

सहकार क्षेत्रात अग्रगण्य बँक म्हणून ओळख असलेल्या शरद सहकारी बँकेची सर्व सेवक प्रशिक्षण कार्यक्रम व स्नेह मेळावा बुधवार दिनांक १९ रोजी जीवन मंगल कार्यालय मंचर येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सकाळी साडेनऊ ते दहा च्या दरम्यान नाव नोंदणी करून कार्यक्रमाला सुरुवात झाली . यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व कार्यक्रमाचे उद्घाटन संपन्न झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब जाधव यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे मनोगत व्यक्त झाल्यानंतर अतिरिक्त आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे चे शैलेश कोथमीरे यांनी नागरी बँक पुढील आव्हाने व त्यावरील उपाययोजना यावर मार्गदर्शन केले. पीडीसी बँकेचे जनरल मॅनेजर अंकुश शिंदे यांनी बँकेच्या प्रगतीसाठी अधिकारी व कर्मचारी यांच्यातील समन्वय याबाबत मार्गदर्शन केले. तर मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देशमुख यांनी दुरगामी वाटचालीचे नियोजन याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, शरद बँकेचे अध्यक्ष देवेंद्र शहा यांच्या वतीने बँकेचे सीईओ राजेंद्र देशमुख व इतर सर्व सेवकांचे कामाचे कौतुक करण्यात आले. यावेळी शरद बँक उपाध्यक्ष विवेक वळसे पाटिल, शरद बँक संचालक दत्ता थोरात , दौलतभाई लोखंडे, सुषमा शिंदे, रूपाली झोडगे 'शरद बँकेचे उपकार्यकारी अधिकारी बाबासाहेब जाधव, बँकेचे अधिकारी अश्विनी भोर, जयराम दैने, पोपट पोखरकर, अजीत देवकर, राजाराम डेरे ' सचिन जाधव, अभय आवटे, रविंद्र नाईकडे, यांसह शरद बँकेचे सर्व सेवक कर्मचारी वृंद उपस्थित होते.

मॉर्निंग वॉकला घराबाहेर पडणारे नागरिक व ज्येष्ठांची सुरक्षा टांगणीला ! शहरी व ग्रामीण भागात खाकी वर्दीचा वचक झालाय कमी

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : राज्यातील शहरी व ग्रामीण परिसरात सर्वत्र सकाळी (मॉर्निंग वॉकला) फिरण्यासाठी किंवा शतपावलीसाठी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांची विशेषतः ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा पूर्णतः टांगणीला लागली आहे. खाकी वर्दीचा वचक दिवसेंदिवस अधिकच कमी होत असल्याने तीच संधी साधत बनेल, भूरटे दुचाकीस्वार चोरटे वारंवार लक्ष्य करत आहेत. ज्यामुळे अनेकांचे दागिने, मोबाईल किंवा महागड्या वस्तू लुटल्या जावून ते चोरटे पोबारा करीत असतात. प्रसंगी कित्येकांच्या जीवावरही घेतल्याच्या गंभीर घटना घडल्याचे पुणे शहरात मागील दीड महिन्यात वारंवार आढळून आले आहे. शहरात अशा २१ जबरी चोरीच्या घटना घडल्या असून, पोलीस प्रशासनाची सुरक्षा व्यवस्था कुचकामी ठरली गेली असून ती अधिक मजबूत करण्याची गरज असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

शहरात जबरी चोरीच्या घटनांमध्ये वाढ

सकाळच्या वेळी रस्त्यांवर त्या तुलनेने गर्दी तशी कमीच असते, त्यामुळे ते बेसावध असतात तर चोरटे मात्र सोबत जीवघेणी तथा जीवाला इजा पोहोचवता येईल अशी कोणतीही तीक्ष्ण हत्यारे जवळ बाळगून असतात. त्यामुळे ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. तद्वतच चोरट्यांना नागरिकांकडून म्हणावा असा मोठा प्रतिकार होण्याची शक्यता कमीच असते. त्याचाच गैरफायदा घेत चोरटे सकाळी मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांना, विशेषतः महिला, पुरुष ज्येष्ठांना लक्ष्य करीत आहेत. परिणामी पीडित महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांना अधिकच धोका निर्माण होत आहे. गेल्या ४५ दिवसांत शहरात अशा २१ गंभीर घटना घडल्या असून त्यापैकी १८ घटना उघडकीस आल्या आहेत.

सावधगिरी कशी बाळगावी ?

शक्यतो एकटे फिरणे टाळावे, शिवाय घराबाहेर पडताना सोबत कोणाला तरी घेऊन जावे. अनोळखी व्यक्तींपासून सावध राहावे.

किरकोळ कारणावरून वाद घालू नयेत. दागिने घालून फिरू नयेत.

पैसे व मोबाईल अथवा किंमती वस्तू शक्यतो जवळ बाळगू नये. बाळगायच्या असतील तरी त्या वस्तू अशा प्रकारे ठेवावेत की, चोरट्यांना ते सहज हिसकावता येणार नाहीत. शंकास्पद व्यक्ती किंवा वाहन दिसल्यास त्वरित पोलिसांना कळवावे. दुचाकीस्वाराने पत्ता विचारल्यास त्याच्याजवळ थांबू नये.

शहरात पोलिस गस्त वाढविण्याची मागणी

सकाळी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या नागरिकांची संख्या दिवसेंदिवस अधिक वाढत आहे, त्यामुळे पोलिसांची सुध्दा गस्त त्या तुलनेत वाढविणे आवश्यक आहे. विभागनिहाय महिला व पुरुषांची किंवा तरुणाईची गस्ती पथकं तैनात ठेवावीत. त्यांना पोलीस विभागाकडून अधिकृत अशी ओळखपत्र, काठी ठराविक पध्दतीचा गणवेश दिला गेल्यास दिमतीला ही कुमक वाढविली गेल्यास पोलीस तथा सुरक्षा यंत्रणेचा त्राणही बऱ्यापैकी कमी होऊ शकेल, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. पोलीस उपायुक्त शैलेश बलकवडे यांनी सांगितले की, 'शहरात सोनसाखळी हिसकावण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. चोरटे प्रामुख्याने महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करत आहेत. त्यामुळे पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे.' तथापि वाढविलेला तो बंदोबस्त त्या तुलनेने फारच अपुरा असल्याने अशा गंभीर घटना घडत आहेत. त्यासाठी गस्ती पथकं तैनात ठेऊन टांगणीला लागलेली सुरक्षा नियंत्रणात आणणे शक्य होईल. अशीच परिस्थिती राज्यात सर्वत्र असल्याने महाराष्ट्र सरकारला विशेषतः गृहविभागाला या बाबतीत गांभीर्याने विचार करुन संपूर्ण राज्यपातळीवर अशी यंत्रणा राबवणे शक्य व्हावे, यासाठीची दूरदृष्टी ठेवूनच निर्णय घेणे आवश्यक आहे.

ढोरेगाव न्यू हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात ; २८ वर्षांनंतर वर्ग मित्र एकत्र ; जुन्या आठवणींना उजाळा

गंगापूर ■ सुनिल झिंजुर्डे पाटील



गंगापूर : गंगापूर तालुक्यातील ढोरेगाव येथील न्यू हायस्कूल शाळेच्या १९९७/९८ मध्ये शिकत असलेल्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन रविवारी दि. १६ रोजी उत्साहात संपन्न झाले. यावेळी तब्बल २८ वर्षांनी माजी विद्यार्थी एकत्र आले. २८ वर्षांच्या जुन्या आठवणींना त्यांनी यावेळी उजाळा दिला. एवढेच नाही तर या धावपळीच्या व्यस्त जीवनातून वेळ काढत एकत्र जमत हितगुज केले.

त्यांच्या या हितगुजीने विद्यार्थी, विद्यार्थीनी प्रत्येक जणाने आपल्या भुतकाळातील आणि सद्यपरिस्थितीतील अनेक सुख-दुखाःच्या गोष्टी एकमेकांना सांगितल्या. या प्रसंगी शाळेतील माजी ५० विद्यार्थी विद्यार्थिनींची उपस्थित होती. २८ वर्षांनंतर एकमेकांचे राहणीमान, बदलेले चेहरे आणि बोलीभाषा यांचे निरीक्षण करीत विद्यार्थिदशेतील आठवणींनां उजाळा देताना अनेकांचे डोळे भरून आले होते. पहिली ते दहावीपर्यंत सोबत शिक्षण घेणारे वर्गमित्र दहावी परीक्षेनंतर वेगवेगळ्या क्षेत्रांत स्थायिक झाले. कोणी उच्च शिक्षणासाठी बाहेरगावी गेले, तर कोणी व्यवसायात तर कोणी नोकरीत सक्रिय झाले. काही शेतकरी झाले.

एकमेकांपासून दुरावलेले हे वर्गमित्र २८ वर्षांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून एकत्र आले. त्यानंतर त्यांनी स्नेहमेळावा आयोजित केला. या जुन्या दोस्तांची २८ वीस वर्षांनंतर पुन्हा एकदा शाळा भरविल्याने पांगलेले मित्र पुन्हा एकदा एका धाग्यात गुंतले आहेत. हे सर्व वर्ग मित्र अमीन पटेल, खंडेराव पवार, रघुनाथ पदार, संतोष पवार, नवनाथ साखरे, दत्तात्रे पवार, सत्तार पटेल, सुलक्षना सुराशे, मीना राबडे यांच्या माणूसकीच्या धडपडीतून पुन्हा एकदा जमा झाली. पुढच्या कार्यक्रमाला भेटण्याचा निश्चय करून एकमेकांचा निरोप घेतला.

महाराजा चॅम्पियन करंडक लोणी येथील शिवशंभो संघाने पटकावला

लोणी-धामणी ■ कैलास गायकवाड



लोणी -धामणी : अन्नापूर ता. शिरूर महाराजा प्रतिष्ठान आयोजित महाराजा करंडक टेनिस क्रिकेट २०२५ स्पर्धेमध्ये लोणी येथील शिवशंभो संघाने चॅम्पियन करंडक (प्रथम क्रमांक) पटकावला. द्वितीय क्रमांक केंदूर संघाने पटकावला, तृतीय क्रमांक मांडवगण फराटा संघाने चतुर्थ क्रमांक महाराजाआन्नापुर संघाने मिळविला. स्पर्धेतील मालिकेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून वैभव शिनलकर लोणी याला एल इ डी टीव्ही भेट मिळाला. उत्कृष्ट फलंदाज म्हणून मांडवगण येथील प्रतीक फराटा यास सायकल भेट मिळाली. लोणी येथील रोहन कदम यास उत्कृष्ट गोलंदाज म्हणून सायकल भेट मिळाली. चॅम्पियन करंडक व रोख ५५ हजाराचे बक्षीस लोणीच्या शिवशंभो संघाने पटकावले. आत्तापर्यंत शिवशंभोसंगाने विविध ठिकाणी प्रथम क्रमांक पटकावले आहेत. उत्कृष्ट सांघिक खेळ, उत्तम नेतृत्व, व नेहमीचा सराव या सर्व गोष्टीमुळे हा संघ नेहमी विजेता राहिला आहे. संघातील इतर खेळाडू सुलतान शेख, साहिल कदम, अमित आदक, शादाब सय्यद, करण सुरवसे, तेजस धुमाळ, रोहन जवणे, सुजल क्षीरसागर, साहिल क्षीरसागर, हर्षद थोरात, साई पंचरास कैफ मोमीन व पंच पॅनल कमिटी म्हणून सचिन पवार सर व सागर पवार सर यांनी काम पाहिले. या क्रिकेट संघाला लोणी मधील माजी विद्यार्थी विकास प्रबोधनी यांचे मार्गदर्शन व बांधकाम व्यावसायिक बाबू आदक यांचे सहकार्य लाभलेले आहे. विविध स्तरातील मान्यवरांनी संघाचे कौतुक केले.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विविध विषयांवर बैठक घेतली



नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर शहर व ग्रामीण भागात पोलीस स्टेशन उभारण्यासह विविध विषयांवर आज विभागीय आयुक्त कार्यालयात बैठक घेतली.

आयुक्तालयाच्या सभागृहात आयोजित या बैठकीस प्रभारी विभागीय आयुक्त डॉ. माधुरी खोडे-चवरे, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन ईटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी नरेश झुरमुरे, मुख्य वनसंरक्षक ए. श्रीलक्ष्मी आदी यावेळी उपस्थित होते.

नागपूर शहर व परिसरात वाढती लोकसंख्या लक्षात घेता गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी व परिसरात कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलीस विभागाच्या नागपूर ग्रामीण, शहर व आयुक्तालय हद्दीत नव्याने पोलीस स्टेशन उभारण्यासंदर्भात प्रस्ताव तयार करून शासनास सादर करण्याचे निर्देश या बैठकीत देण्यात आले. यासोबतच महसूल व वने, मृद व जलसंधारण विभागासंदर्भातील विविध विषयांवर श्री. बावनकुळे यांनी यावेळी निर्देश दिले.

सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा निमित्त रवळगाव येथे शिव आरोग्य शिबिर संपन्न

सेलू ■ वसंत आवटे



सेलू तालुक्यातील रवळगाव येथे शिवजन्मोत्सव सोहळा निमित्त शिबिराचे आयोजन केले होते शिबिरासाठी गावातील नागरिकांचा मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला. यावेळी तालुक्यातील या आरोग्य शिबिराला नामांकित डॉक्टरांचा समावेश होता . कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीराम प्रतिष्ठान चे अध्यक्ष संजय रोडगे, प्रमुख पाहुणे डॉ. के पी चौधरी (तालुकाध्यक्ष आरोग्य अधिकारी सेलू)प्रमुख उपस्थिती डॉ. अरुण बप्पा रोडगे (भूलतज्ञ) डॉ. अपूर्वा रोडगे (पारवे) (स्त्री रोग तज्ञ)

डॉ. सविता रोडगे डॉ. योगिता मालाणी (बालरोग तज्ञ) डॉ. शैलेश मालाणी (त्वचारोग तज्ञ) डॉ. कुंदन राऊत(दंत रोग तज्ञ)डॉ. सुनील सोनटक्के (नेत्ररोग तज्ञ)श्री राम सुरवसे(ऑप्टीमिस्ट) डॉ. दीपक सासोडे (सी एच ओ)स्त्री रोग तज्ञ बाळ रोग तज्ञ त्वचारोग तज्ञ दंत रुग्ज्ञ नेत्ररोग तज्ञ सर्व डॉक्टरांनी मोफत तपासणी केली नागरिकांनी चांगलं प्रतिसाद दिला त्यावेळी १२० पेशंटची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे निशिकांत रोडगे, संभाजी रोडगे, रामेश्वर रोडगे, दत्ताराव गाडेकर, संभाजी रोडगे, अमर रोडगे, अक्षय रोडगे , बालाजी आवटे, अर्जुन रोडगे आयोजन केले शिवजन्मोत्सव कमिटी रवळगाव प्रास्ताविक केले सुत्र संचालन केले भागवत रोडगे प्रास्ताविक केले डॉ सासोडे यांनी आभार प्रदर्शन वानरे मॅडम केले.

'एकनाथ हिरक आरोग्य वर्ष' अंतर्गत श्री शिव योद्धा प्रतिष्ठान आयोजित

उंब्रज ■ कुलदिप मोहिते

उंब्रजला सोमवारी महाआरोग्य शिबीर ; पालकमंत्री ना. शंभुराज देसाई, मंगेशजी चिवटे यांची प्रमुख उपस्थिती



उंब्रज : उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त 'एकनाथ हिरक आरोग्य वर्ष' अंतर्गत सौभाग्य मंगल कार्यालय कॉलेज रोड उंब्रज ता. कराड येथे सोमवार ता. २४ फेब्रुवारी रोजी स. १० वा. श्रीशिवयोध्दा प्रतिष्ठाण शिवसेना वैद्यकिय मदत कक्ष व गांधी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने मोफत महाआरोग्य तपासणी व औषधोपचार व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती श्रीशिवयोध्दा प्रतिष्ठानचे वतीने देण्यात आलीआहे.

उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष संस्थापक अध्यक्ष मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली हे वर्ष 'एकनाथ हिरक आरोग्य वर्ष' म्हणुन साजरे होत असुन संपुर्ण महाराष्ट्रात मोफत महाआरोग्य शिबिरांचे आयोजन केले जात आहे.

दरम्यान उंब्रज येथील आरोग्य शिबिरात मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार, मोफत चष्मा वाटप, व मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीर, तसेच दिव्यांग बांधवांना मोफत हात पाय व कॅलीपर्स चे वाटप करण्यात येणार असुन, रक्तदान शिबिरांतर्गत प्रत्येक रक्तदात्यास आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार असल्याची माहिती प्रतिष्ठानकडून देण्यात आली आहे

महाआरोग्य शिबिरास पर्यटन व खनिजकर्म मंत्री तथा पालकमंत्री सातारा ना. शंभुराज देसाई, उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षप्रमुख मंगेशजी चिवटे, कार्याध्यक्ष शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष राम राऊत, गांधी फाऊंडेशन अध्यक्ष धिरज गांधी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी सातारा जिल्हातील जास्तीत जास्त नागरिकांनी या महाआरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीशिवयोध्दा प्रतिष्ठाण उंब्रज च्या वतीने करण्यात आले आहे.

छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय पिंपरखेड येथे शिव जयंती उत्सव साजरी



बीड ■ प्रतिनिधी

वडवणी : पिंपरखेड तालुका वडवणी जिल्हा बीड येथे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती उत्साहात साजरी करण्यात आली आहे..या निमित्त अंगणवाडी ताई कार्यकर्त्या, श्रीमती अग्नी अण्णाभाऊ खळगे, सचिव प्रकाश तुळशीराम खळगे .सर आणि शाळेतील वाचक विद्यार्थी वर्ग उपस्थित होते. शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित सचिव प्रकाश तुळशीराम खळगे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शाळेतील वाचक विद्यार्थी वर्ग यांनी पण आपले विचार प्रभावीपणे मांडले. सर्वांना खाऊ वाटप करण्यात आला..सर्वांचे आभार मानले व कार्यक्रम संपन्न झाला.

'केंद्र शाळा -कुडली येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी'

बीड ■ प्रतिनिधी



बीड वडवणी : केंद्र शाळा - कुडली तालुका रोहा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथम मुख्याध्यापिका सुशीला म्हात्रे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पूजन केले. यानंतर शाळेतील इयत्ता पाचवी ची विद्यार्थिनी वीरा कामथेकर, सिया सरफळे, हर्षल वांगणे, प्रिन्स चव्हाण, इयत्ता सातवीचे स्वप्नाली पडवळ, हर्षिता दळवी, इत्यादी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर श्री मोहन राठोड, अविनाश जाधवर, सारिका पोटे यांनी छत्रपती शिवाजी विषयी माहिती सांगताना असे सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. असा हा जागतिक धर्मनिरपेक्ष, राजा केवळ पन्नास वर्षे जगले. पण जगात एकमेव असा राजा आहे की ज्याला रयतेचा राजा असं म्हटलं जातो. ज्या राज्याची खाती अशी होती की दुश्मन सुद्धा त्यांची स्तुती करायचे, छत्रपती शिवाजी महाराजांचा गनिमा कावा इतिहास अजमर आहे. अशा या आपल्या राजाची आज जयंती आहे या जयंतीनिमित्त सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा असे सांगून शेवटी श्रावणी पंदेकर यांनी सर्वाचे आभार मानून कार्यक्रम संपला असे जाहीर केले. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक. उपस्थित होते.

शिल्लेगाव पोलिसांनी अवघ्या काही तासात लावला पिकअपसह चोरी गेलेल्या अडीच लाख रुपयांच्या सफरचंदचा छडा

पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक योगेश खटाने यांनी केला तपास

गंगापूर ■ सुनिल झिंजुर्डे पाटील



गंगापूर: गंगापूर तालुक्यातील शिल्लेगाव पोलीस ठाणे हद्दीतील दिवशी पिंपळगाव येथून १४ तारखेला मध्यरात्री अज्ञात आरोपीनी तब्बल २ लाख ५० हजार रुपयांचे सफरचंद वं पिकअप क्रमांक (एम.एच.२०.जी.सी.४९९७) या गाडीसह पोबारा केला होता त्यामुळे गाडीचा क्लीनर राहुल कारभारी मोरे (वय १८ वर्षे) रा. देवगांव रंगारी ता. कन्नड याने फिर्याद दिली की गाडीमालक रहेमत तय्यब शेख व अशोक हरीभाऊ लंबे यांच्या सांगण्यावरून मी व चालक संकेत वाकळे (रा. डोणगाव) मुबंईच्या एफ.पी.एम.सी मार्केट वाशी येथून सफरचंद घेऊन १५ तारखेला संध्याकाळी ७ वाजेच्या दरम्यान लासूरमार्गे डोणगावला आलो गाडीमालक व मी ते सफरचंद जालना येथील व्यापाऱ्याला पोहच करणार होतो त्यामुळे डोणगाव येथे घरी जेवण केल्यानंतर रात्री साडे अकरा वाजेच्या सुमारास संकेत यांस गावात सोडून मी सफरचंदसह पिकअप गाडी घेउन मालकांची वाट पाहत पिंपळगाव फाटा येथे थांबलो होतो तेवढ्यात त्याठिकाणी

एका पल्सर गाडीवर तीन अनोळखी लोक आले व त्यांनी गाडी माझे गाडीजवळ थांबवुन माझी पिकअप

गाडी चालु करुण डोणगांवच्या दिशेने पळून गेले तेव्हा मी आरडा-ओरड केली असता ते गाडी घेवुन

जोरात निघुन गेले माझा मोबाईल हा गाडीतच असल्यामुळे मला कोणालाही फोन करता आला नाही

त्यामुळे पायी चालत शिवनेरी हॉटेलवर आलो आणी तेथुन हॉटेल मालकाचा मोबाईल घेवुन मालकाला हकीकत सांगितले ते मालक तात्काळ घटनास्थळी आले मात्र गाडी मिळवून आली नाही म्हणून शिल्लेगाव पोलिसांत तक्रार दिली दरम्यान गुन्हा दाखल होताच शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक योगेश खटाने यांनी तपासाची चक्रे गतीने फिरवत चोरी गेलेली बोलेरो पीकअपचा शोध घेत असताना त्यांना गोपनीय सूत्राकडून माहिती मिळाली की सदर पिकअप गाडी सिरसगाव शिवारात उभी असल्याचे समजले सदर गाडीत पाहिली असता त्यात २ लाख ५० रुपये किमतीचे १० किलो वजनाच्या एकुण - २५० सफरचंदचे कॅरेट दिसले नाही त्यामुळे शिल्लेगाव पोलिसांनी आणखी सूत्रे हलवत तपासाची चक्रे चोरांकडे फिरवली असता सदर सफरचंद समीर चांद सय्यद रा.अकोली वाडगाव, रतन रघुनाथ राऊत रा.काटे पिंपळगाव व एक अल्पवयीन युवक यांच्याकडे असल्याचे समजले त्यामुळे पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले असता त्यांनी ते सफरचंद समीर सय्यद याची पिकअप गाडी क्रमांक एम. एच. २० ई.एल.७९३२ मध्ये भरलेले असल्याचे सांगितले त्या गाडीचा तात्काळ शोध घेऊन सफरचंद ताब्यात घेतले वं जालना येथील व्यापाऱ्याच्या ताब्यात दिले यावेळी शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस, तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक योगेश खटाने बिट अंमलदार तात्याराव बेदरे, पो.कॉ.अर्जुन तायडे, राजेंद्र निसर्गे आदींची उपस्थिती होती.

क्षेत्र मोर्वे येथील अमृता जगताप हिची महसूल सहाय्यक पदी निवड

खंडाळा ■ गणेश गुरव



खंडाळा : तीर्थक्षेत्र मोर्वे तालुका खंडाळा येथील माजी सरपंच कै. सदाशिव महादेव जगताप यांची नात आणि गुरुदत्त ज्ञानपीठ मोर्वे शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तानाजी जगताप यांची कन्या कु. अमृता तानाजी जगताप ही महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण होऊन तिची महसूल सहाय्यक पदी निवड झाली.

अमृता ही गेली आठ वर्षापासून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करीत होती परंतु स्पर्धा परीक्षेमध्ये थोड्या थोड्या गुणांसाठी तीला अपयश येत होते. परंतु अथक प्रयत्नानंतर यश मिळालेच आणि अमृताची महसूल सहाय्यक पदी निवड झाली.

अमृताचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोर्वे तर माध्यमिक शिक्षण माध्यमिक विद्यालय मोर्वे येथे झाले आहे. माध्यमिक विद्यालय मोर्वे शाळेच्या इयत्ता दहावी विद्यार्थ्यांच्या शुभ चिंतन कार्यक्रम प्रसंगी अमृता हिचा संस्था, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व ग्रामस्थ मोर्वे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी सरपंच मल्हारी जगताप, गुरुदत्त ज्ञानपीठ शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तानाजी जगताप पोलीस पाटील राहुल धायगुडे व्याख्याते विलास भोसले, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ राजश्री जाधव ,सदस्य निकम, जाधव, मुख्याध्यापक गुळदगड सर आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते.

अमृता जगताप हीचे गुरुदत्त ज्ञानपीठ मोरवे संस्थेचे अध्यक्ष रामराजे नाईक निंबाळकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि मंत्री मकरंद आबा पाटील यांनी अभिनंदन केले.

केंद्रीय युवा कार्यक्रम आणि क्रीडा राज्यमंत्री श्रीमती रक्षा निखिल खडसे यांच्या हस्ते २६व्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे चंद्रपूर येथे उद्घाटन

नागपूर ■ दिलीप येवले





नागपूरः आज केंद्रीय युवा कार्यक्रम आणि क्रीडा राज्यमंत्री श्रीमती रक्षा खडसे यांच्या हस्ते २६ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२४ चे उद्घाटन करण्यात आले. हा महोत्सव गोंडवाना विद्यापीठाच्या यजमानपदाखाली दिनांक १८ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी २०२५ दरम्यान चंद्रपूर व बल्लारपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच त्यांना राज्यस्तरीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्याचा सन्मान मिळाला आहे.

या महोत्सवात कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, अ?थलेटिक्स व बुद्धिबळ असे ८ क्रीडा प्रकार समाविष्ट आहेत. या स्पर्धेत आतापर्यंत २२४५ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली असून अंदाजे ४५०० खेळाडू महोत्सवात सहभागी होतील.

केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी या क्रीडा महोत्सवाचे कौतुक करताना सांगितले की, हा उपक्रम सरकारच्या क्रीडा धोरणाला ग्रामीण आणि शहरी पातळीवर प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनाचा एक भाग आहे. तसेच, भविष्यातील आंतरराष्ट्रीय खेळाडू घडवण्यासाठी केंद्र सरकार अशा क्रीडा उपक्रमांना भक्कम पाठिंबा देण्यास कटिबद्ध आहे,

या महोत्सवात उद्घाटन समारंभानंतर भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. हा महोत्सव केवळ खेळांसाठीच नव्हे, तर विद्यार्थ्यांना एकत्रित आणून महाराष्ट्राच्या क्रीडा संस्कृतीला चालना देण्याचा एक अनोखा उपक्रम ठरणार आहे.

उद्घाटन समारंभात रक्षा खडसे यांनी खेळ क्षेत्राला 'सनराईज इंडस्ट्री' म्हणत युवकांसाठी मोठ्या संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. तसेच, गोंडवाना विद्यापीठाचे अभिनंदन करत त्यांनी क्रीडेमुळे युवा पिढीमध्ये शिस्त, संघभावना व उत्कृष्टतेचा विकास होतो यावर भर दिला. केंद्र सरकार खेळांना चालना देण्यासाठी आणि नवोदित खेळाडूंना संधी मिळवून देण्यासाठी पूर्णतः कटिबद्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले.

केंद्रीय राज्यमंत्री खडसे यांनी या प्रतिष्ठित क्रीडा स्पर्धेचे कौतुक करत मूलभूत पातळीवर खेळांना चालना देणे आणि नवोदित खेळाडूंना घडवणे हे सरकारचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले. भविष्यातील विजेते तयार करण्याच्या दृष्टिकोनातून अशा उपक्रमांना केंद्र सरकारचा संपूर्ण पाठिंबा राहील, असेही त्यांनी सांगितले.

चंद्रपूर हे राज्यातील क्रीडा उत्कृष्टतेचे केंद्र होईल आणि क्रीडा सुविधा सुधारण्यासाठी आपण पूर्ण सहकार्य करू असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या महोत्सवाला या कार्यक्रमाला आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी श्री. विनय गौडा जी. सी., जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अविनाश पुंड आणि चंद्रपूरचे माजी उपमहापौर श्री. राहुल पावडे यांची उपस्थिती लाभली. तसेच, खेळाडू, प्रशिक्षक आणि क्रीडाप्रेमींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा सोहळा अधिक भव्य आणि उत्साही झाला.

बुटी पब्लिक स्कूलच्या मुलींनी 'रस्सीखेच स्पर्धेमध्ये रौप्य पदक जिंकले

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूरः बुटी पब्लिक स्कूलच्या मुलींनी 'रस्सीखेच स्पर्धेमध्ये रौप्य पदक जिंकले. छत्रपती संभाजिनगर, औरंगाबाद येथे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत २०२४-२५ च्या राज्य पातळीवरील शाळेतील संघटनेचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाद्वारे आयोजित केले गेले होते. बुटी पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश मिळविले आणि अंडर-१४ मुली यामध्ये आरुषी निनावे, कनिष्का यादव, जान्हवी भिसेन, तनिशा मौदेकर, त्रिशा मौदेकर, भाविका सोनवाने, मानवी सरोदे, योगिनी मौदेकर, श्रावणी सदावरते या मुलींचा समावेश आहे. (३४० किलो वजन गट) यांनी रौप्य पदक जिंकले. क्रीडा शिक्षक अभिषेक चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे खेळ सादर केले. या उत्कृष्ट कामगिरीवर शाळेतच्या संचालिका कल्याणी बुटी, प्रीती बुटी, शाळेच्या मुख्याध्यापिका अरुणा चौबे यांनी विजयी विद्यार्थीनींचे कौतुक केले आणि भविष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. ही उपलब्धि पुन्हा एकदा बुटी पब्लिक स्कूल ने खेळाची प्रतिभा दाखवून सिद्ध केली आहे. शाळेच्या कुटुंबाला या यशाचा अभिमान आहे. प्रत्येकजण आशावादी आहे की या विद्यार्थीनीं भविष्यात जास्त उंचीवर पोचतील.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारे साधन म्हणजे स्नेह संमेलन मेळावा : अनिल चौधरी

सेलू ■ प्रशांत झाडे

श्री. संत केजाजी कॉन्व्हेन्ट चा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न



सेलू : स्थानिक श्री. संत केजाजी प्री. प्रायमरी स्कूल घोराड येथे नुकताच स्नेह संमेलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भरगच्च प्रेक्षकांच्या उपस्थितीत चिमुकल्यांनी नृत्य सादर करीत आपल्या सुप्त कलागुणांना उजाळा दिला.

श्री. संत केजाजी प्रि. प्रायमरी स्कूल च्या आठव्या स्नेह संमेलन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेलू शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अनिल चौधरी,प्रमुख अतिथी म्हणून घोराड गावच्या माजी सरपंच ज्योती घंगारे,दीपचंद चौधरी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक शालिक झाडे, देशोनत्ती पेपरचे सेलू तालुका प्रतिनिधी भारत घवघवे, श्री. संत केजाजी कॉन्व्हेन्ट चे संस्था संचालक तथा मुख्याध्यापक प्रशांत झाडे उपस्थित होते. मान्यवरांचे हस्ते सर्वप्रथम श्री. संत केजाजी महाराज तसेच माता सरस्वती यांच्या फोटो चे विधिवत पूजन करण्यात आले. वर्षभर शाळेत घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात अनिल चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हटले की विद्यार्थ्यांना या लहान वयात या पद्धतीने स्टेज उपलब्ध करून दिल्यास विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना नक्कीच वाव मिळत असतो. यावेळी त्यांनी सदर कार्यक्रमा करिता विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

आठव्या स्नेह संमेलन कार्यक्रमात शाळेतील नर्सरी केजी वन केजी टू च्या सर्वच विद्यार्थ्यांनी विविध नृत्य सादर करीत उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. सदर कार्यक्रमात चिमुकल्यांनी देशभक्ती नृत्य गोंडी नृत्य , विठ्ठल , दक्षिण नृत्य अश्या विविध प्रकारच्या गाण्यावर नृत्य सादर केले.कार्यक्रमात पालक वर्ग तसेच प्रेक्षक वर्ग यांच्या कडून चिमुकल्यांचा कलाविष्कार बघत त्यांना दाद दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजना करिता शाळेतील शिक्षिका श्वेता झाडे, सुवर्णा पिसे, प्रिया शिंदे, स्वाती फटिंग, आरती भुरे, पंकज तडस यांनी परिश्रम घेतले .

अडेगाव येथील सक्षम इंग्लिश मीडियम शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन!



देवळी ■ सौ.आरती गोसटकर/कारंजेकर

देवळी : अडेगाव येथील सक्षम इंग्लिश मीडियम स्कूल मधे १० फेब्रुवारी रोजी संस्कृतीक कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सतिश आत्राम माजी गटशिक्षण अधिकारी देवळी उपस्थित होते.तर प्रमुख पाहुणे युवा संघर्ष मोर्चा चे अध्यक्ष किरण ठाकरे युवा सक्षम इंग्लिश मीडियम स्कूल अडेगाव चे संस्थापक अध्यक्ष अरविंद लोखंडे माजी सभापती प.स.देवळी येथील विद्याताई भुजाडे,माजी सदस्य प.स.देवळी अशोक सराटे, सामाजिक कार्यकर्ता दशरथ भुजाडे

तुळशीदास ताल्हन मुख्याध्यापिका मिना लोखंडे कार्यक्रमाला उपस्थित होत्या.या स्कूल मधील नर्सरी ते इयत्ता सातवीतील सर्व विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे नृत्य सादर केले. घेण्यात आलेल्या क्रीडास्पर्धामधील प्रथम क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्याच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाला गावातील नागरिक तथा पालकवर्ग मोठ्याप्रमाणात उपस्थित होता. कार्यक्रमाचे संचालन उषा पाल यांनी केले तर आभार मोनाली खोडे यांनी मानलेत.

मॉडेल हायस्कूल भारसवाडा येथे५७ वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्नेह संमेलन उत्साहात

साहूर ■ शरद वरकड



साहुर : मॉडेल हायस्कूल भारसवाडा ता.आष्टी जिल्हा वर्धा येथील विद्यालयात तब्बल ४१ वर्षांनी १ तासाची शाळा हा आगळावेगळा कार्यक्रम इयत्ता १० वी शैक्षणिक वर्ष १९८४ ची बॅच मित्रांनी स्नेह मिलन सोहळा पार पाडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मॉडेल हायस्कूल भारसवाडा येथील मुख्याध्यापक थोटे सर माझी सेवानिवृत्त शिक्षक ढोक सर, कावळे सर, प्रभाकरराव मेने, भोयर सर यांनी प्रमुख वक्ते म्हणून मोलाचे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सुत्र संचालन गोंधाने सर यांनी केले.याप्रसंगी माझी विद्यार्थीनीं आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि उपस्थित विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माझी विद्यार्थी डॉ.प्रमोद लोहकरे, राहुल कोचे, अरूण खेडकर, सुनील साबळे, संजय शिंदे, नंदा गांडोळे, विनोद कडु, संजय ढगे, वनिता कावळे, ज्योती गुजर यांनी अथक परिश्रम घेऊन ४१ वर्षांनी मॉडेल हायस्कूल भारसवाडा येथे स्नेह मिलन सोहळा पार पाडला. यावेळी जुन्या आठवणी ताज्या झाल्या आणि विद्यार्थ्यांच्या डोळयातून अश्रू वाहू लागले आपल्या बालपणाच्या ताज्या घडामोडी सर्वांच्या डोळयासमोर उभ्या राहिल्या लहानपण देगा देवा अशा प्रकारची प्रतिक्रिया यावेळी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली १९८४ पासून काही विद्यार्थ्यांची एकमेकांसोबत भेट सुद्धा झालेली नव्हती परंतु या कार्यक्रमामुळे ४१ वर्षांनी त्यावेळी चे सर्व विद्यार्थी एकत्र आले आणि त्यांचा आनंद गग्नामध्ये मावत नव्हता इतका आनंद त्यावेळच्या विद्यार्थ्यांना झाला आणि प्रत्येकाने आपले मनोगत व्यक्त करत आपल्या जुन्या आठवणी ताज्या केल्या हे विशेष.

बॅरी.शेषराव वानखेडे महाविद्यालयात आर्थिक विकासात वित्तीय बाजाराचे महत्त्व यावर व्याख्यान

खापरखेडा ■ दिलीप येवले



खापरखेडा : बॅरिस्टर शेषराव वानखेडे डे कला व वाणिज्य महाविद्यालय खापरखेडा येथील अर्थशास्त्र विभाग व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्मार्ट निवेशक जागरुकता कार्यक्रम अंतर्गत आर्थिक विकासात वित्तीय बाजाराचे महत्त्व या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आलेले होते या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्याचे प्राचार्य डॉ.आर.जी.टाले यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आलेले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर येथील अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक सागर तावर हे होते. त्यांनी अर्थव्यवस्थेत होणाऱ्या बदलाचे आर्थिक विकासावर कशा प्रकारे परिणाम होत आहे शेअर्स मार्केट व म्युच्युअल फंड यासारख्या गुंतवणूकींमुळे आपल्या उत्पन्नात बदल करून आणता येतो प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात आर्थिक साक्षर असायला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जी टाले होते त्यांनी आपल्या अध्यक्ष भाषानातून वित्तीय व बाजाराचे महत्त्व समजून सांगितले

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉक्टर गजानन सोमकुवर यांनी केले त्यांनी वित्तीय बाजारात असलेल्या संस्थांचा आढावा घेतला व देशाच्या विकासासाठी वित्तीय बाजार कसा महत्त्वाचा आहे हे त्यांनी आपल्या प्रास्तविकेतून सांगितले

या कार्यक्रमाचे संचालन वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. प्रफुल्ल जोवार यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. जया फाये यांनी केले

या कार्यक्रमाला प्रा. डॉ. धनराज शेटे प्रा. डॉ. प्रतिभा गडवे प्रा. वनिता तांडेकर.प्रा. वंजारी उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठीअरुण सिंदूरकर राजेश कठोटे सतीश मकरंदे यांनी विशेष प्रयत्न केले या व्याख्यानाच्या कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते

माँयल टायगरमॅन, ट्रायथलॉन, डूएलॉन २०२५ ला संपन्न

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : भारतातील सर्वात मोठी ट्रायथलॉन स्पर्धा, माँयल टायगरमॅन ट्रायथलॉन आणि ड्युएथलॉन २०२५, ९ फेब्रुवारी २०२५ रोजी यशस्वीरित्या संपन्न झाली, ज्यामध्ये चिकाटी आणि लढाऊ वृत्तीसह क्रीडा वृत्तीचा उत्सव साजरा करण्यात आला. ९ फेब्रुवारी रोजी माँयल मुख्यालयात झालेल्या समारोप समारंभात माँयलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक अजित कुमार सक्सेना, एमईसीएलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक इंद्र देव नारायण, माँयलचे संचालक (वित्त) राकेश तुमाने, माँयलचे संचालक (मानव संसाधन) उषा सिंग, माँयलचे संचालक (उत्पादन आणि नियोजन) एमएम अब्दुल्ला, रेस डायरेक्टर डॉ. अमित समर्थ आणि टायगरमनचे इतर प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

या वर्षीच्या आवृत्तीला प्रचंड प्रतिसाद मिळाला, देशभरातील ११ राज्यांमधून ३७५ उत्साही सहभागींनी विविध आव्हानात्मक श्रेणींमध्ये स्पर्धा केली. या स्पर्धेत प्रतिष्ठित टायगरमॅन, ट्रायथलॉन अल्टीमेट २५५, १८३ आणि १२२ तसेच ऑलिंपिक अंतरांचा समावेश होता, ज्यामध्ये पोहणे (१.५ किमी ते ५ किमी), सायकलिंग (४० किमी ते २०० किमी) आणि धावणे (१० किमी ते ५० किमी) यांचा समावेश होता.

८ फेब्रुवारी रोजी, ११-१४ आणि १५-१८ वयोगटातील तरुण खेळाडूंनी ट्रायथलॉन आणि ड्युएथलॉन स्पर्धांमध्ये भाग घेतला, ज्यात पोहणे (२५० मीटर ते ७५० मीटर), सायकलिंग (१० किमी ते २० किमी) आणि धावणे (२ किमी ते ७ किमी) यांचा समावेश होता आणि त्यांनी त्यांचा दृढनिश्चय आणि क्रीडा कौशल्ये दाखवली.

सहभागींना संबोधित करताना, श्ध्छ्ध् चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक अजित कुमार सक्सेना यांनी या आव्हानात्मक ट्रायथलॉन आणि ड्युएथलॉन स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक खेळाडूचे कौतुक केले ज्यामुळे त्यांचा अनुभव वाढला आणि अनेक खेळाडूंना प्रेरणा मिळाली.

मौदा येथे उच्च श्रेणी मुख्याध्यापक व प्राथमिक शिक्षकांचे अधिवेशन

काटोल ■ प्रशांत पवार



काटोल : महाराष्ट्र राज्य उच्च श्रेणी मुख्याध्यापक व सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक महासभा नागपूरङ चे २४वे जिल्हा अधिवेशन व सत्कार समारंभ २०२५ दिनांक १६ फेब्रुवारी २०२५ ला मौदा येथील धनजोडे सभाग्रहात आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनाला मा ना . चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री म . रा . मा ना आशिष जयस्वाल राज्यमंत्र म . रा . मा चरणसिंग ठाकूर आमदार . मा आ सुधाकर अडबाले . शिक्षक आमदार . मा टेकचंद जी सावरकर माजी आमदार . मा विपूल जाधव उपमुख्य कार्यकारी अधिकारी जि पं नागपूर . मा कुमुदिनी श्रीखंडे मुख्य लेखा व वित अधिकारी जिप नागपूर . मा सिध्देश्वर काळूसे शिक्षणाधिकारी जि प नागपूर . मा तापेश्वर वैद्य मा देवेन्द्रजी गोडबोले . माजी सभापती तथा माजी उपसभापती पस मौदा मा गटविकास अधिकारी मा गटशिक्षणाधिकारी पंस मौदा इत्यादी अधिकारी उपस्थित रहाणार आहेत

महाराष्ट्रातील सेवानिवृत्त शिक्षकांच्या विविध समस्या आणि हक्कासाठी लढणारी एकमेव संघटना म्हणजे महाराष्ट्र राज्य उच्च श्रेणी मुख्याध्यापक व सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक महासभा नागपूर आहे.

सेवानिवृत्तांना अंशदान राशीकरण आणि उपदान मिळवून देण्यासाठी सन २०२३ मध्ये पोस्टकार्ड आंदोलन, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ग्रामविकासमंत्री, शिक्षणमंत्री यांच्या वारंवार भेटी आणि निवेदन देऊन दबाव निर्माण करण्यात महासभेने महत्त्वाची भूमिका बजावली. नागपूर जिल्ह्यातील प्रत्येक पंचायत समिती समोर एकाच दिवशी धरणे आणि थाळीनाद आंदोलन, विधानसभेवर भव्य मोर्चा काढून शासनाकडून अनुदान प्राप्त करून घेणारी महाराष्ट्रतील एकमेव संघटना ठरली.

या महासभेचे २४वे भव्य जिल्हा अधिवेशन धनजोडे सभागृह मौदा येथे आयोजित करण्यात आले आहे. तरी आपण सर्वांनी अधिवेशनाला उपस्थित राहावे आणि अन्य सेवानिवृत्तांना उपस्थित राहण्यासाठी प्रेरीत करून महासभा बळकट करण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन पत्रकार परिषदेत करण्यात आले. पत्रकार परिषदेला महासभेचे अध्यक्ष अशोक दगडे, सरचिटणीस दिपक सावरकर, विनोद राऊत, पत्रकार प्रशांत पवार . पत्रकार गोपायकडू पत्रकार प्रा सुनील मोहोड . पत्रकार संजय वाळके पत्रकार रमेश चव्हाण व मुरलीधर कामडी ज्ञानेश्वर वानखेडे, संजय भेंडे, , जयदेव ठाले, सुधाकर भुरके, अनिल नागपुरे, गोपाल कडू, रामदास काकडे, दिपक तिडके, नबी शेख, रामभाऊ ठाकरे, दामोदर झाडे, शशी पाटील, सुनिता दामले, मालती आगरकर, अशोक तपासे, श्रीराम वाघे, प्रविण बेले, आणि इतर जिल्हा व तालुका पदाधिकारी उपस्थित होते. असे जिल्हा महासंघाचे प्रवक्ता मुरलीधर कामडे यांनी कळविले.

दहेगाव रंगारी येथे श्री गजानन महाराज प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न पालखी सोहळा व मिरवणुकीत शेकडो भाविकांचा सहभाग

खापरखेडा ■ दिलीप येवले







खापरखेडा : दहेगाव रंगारी येथे १७ फेब्रुवारी सोमवारला मोठ्या उत्साहात श्री गजानन महाराज प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न झाला यावेळी आयोजित केलेल्या भव्य पालखी सोहळा व मिरवणुकीत शेकडो भाविकांनी सहभाग नोंदविला होता.

दहेगाव रंगारी वार्ड क्रमांक ५ पांडे ले आऊट गजानन नगरी परिसरात श्री गजानन महाराज प्राणप्रतिष्ठा व प्रगटदिन उत्सव दिनांक १७ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी पर्यंत आयोजित करण्यात आला आहे.

१७ फेब्रुवारी सोमवारला श्री साई मंदिर ते गजानन महाराज मंदिरा पर्यंत मिरवणूक व पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी शेकडो भाविक सहभागी झाले होते दुपारी १२ ते सायंकाळी ५ वाजे पर्यंत विविधत पूजाअर्चना करून श्रीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

श्रीच्या विजय ग्रंथांचे पारायण व भजन, सुंदरकांड, भक्तिगीत आदि कार्यक्रम आयोजित करण्यात आले २० फेब्रुवारी गुरुवारला ह्भप तुषार सुरपैठणकर यांच्या काल्याच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

उपरोक्त कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्य आयोजक राजेंद्र वानखेडे, आशिष उपासे संयोजक मोरेश्वर मांगुळकर, श्रीधर जाने, दिलीप मांगुळकर, हरेराम सिंग यांच्यासह सोनू डेकाटे, आनंद चव्हाण, घनश्याम पासवान, वानखेडे, यश वानखेडे, वैभव पातूरकर, धीरज भिलकर यांनी केले

या' कारणामुळे क्रूरकर्मा इरफानने केला मोनिकाचा खून;पोलीस निरीक्षक सलीम चाऊस

दोरीने गळा आवळून केला खून,घटनास्थळी कोयताही ठेवला होता आणून

गंगापूर ■ सुनिल झिंजुर्डे पाटील



गंगापूर : व्हॅलेनटाईन डेच्या दिवशी गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथे जालना येथील मोनिका नावाच्या विवाहित युवतीचा लासूर स्टेशन येथील इरफान नावाच्या मित्राने दोरीने गळा आवळून खून करून स्वतःच्या शेतात असणाऱ्या घरात खड्डा करून पुरून टाकणारी व माणूसकीला काळिमा फासणारी घटना घडली होती मात्र आत्तापर्यंत खुनाचे कारण स्पष्ट झालेले नव्हते मात्र आरोपी इरफन्ना अटक केल्यानंतर न्यायालयात हजर केले होते यावेळी न्यायालयाने इरफान ला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती पोलीस कोठडीच्या काळात शिल्लेगाव पोलिसांनी मोनिकाच्या खुनाचे खरे कारण शोधून काढले असल्याची माहिती शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी दिली आहे.

दरम्यान याबाबतची अधिक माहिती अशी की जालना येथील मोनिका मार्कस झांबरे (वय ३० वर्ष)ही विवाहित युवती छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सादातनगर येथील दवाखान्यात नर्स म्हणुन कामं करत होती तीचा विवाह छत्रपती संभाजीनगर येथील सुमित निर्मळ याच्याशी झालेला होता मात्र त्यांच्यात वारंवार वादविवाद होतं असल्याने ती जालना येथे आईवडिलांकडे राहत होती त्यामुळे ती दररोज जालना ते छत्रपती संभाजीनगर रेल्वेने अपडाऊन करत होती वं छत्रपती संभाजीनगर येथील रेल्वे स्टेशन ते महानगरपालिकेच्या दवाखान्यापर्यंत ये जा करण्यासाठी ती स्कुटी चा वापर करत होती ती स्कुटी रेल्वे स्टेशन येथील पार्किंग मध्ये लावत होते त्या पार्किंग मध्ये इरफान जहागीरदार कामाला होता त्यामुळे दररोज इरफान व मोनिकाची भेट व्हायची दररोज भेद होत असल्याने इरफान व मोनिका यांची मैत्री झाली इरफानाने मोनिका तिचे नातेवाईक व तिचा पती यांच्यात समिट व्हावा म्हणून वेळोवेळी मध्यस्थी केली परंतु त्यात तो अपयशी झाला मात्र मोनिकाशी मैत्री झाल्याने तो दिवसातील सात ते आठ तास मोबाईल गप्पा मारायचा असे कित्येक दिवस गेल्यानंतर मोनिका इरफान ला टाळायला लागली व तिचा मोबाईल कायम व्यस्त राहू लागला त्यामुळे इरफानच्या मनात संशयाची पाल चूकचुकली व आपल्या सोबत मोनिका गप्पा मारत नाही याचे शल्य त्याच्या मनात त्याला बोचायला लागले कारण त्याचेही तीन विवाह झालेले असून त्याच्यासोबत एकही पत्नी राहत नव्हती त्यामुळे मनातील हितगुज करायला हक्काचं असं कोणी नव्हते मोनिका भेटली होती मात्र कालांतराने तीही इरफान टाळायला लागली तासंनातास बोलणारी मोनिका बोलणे टाळायला लागल्यावर इरफानला राग अनावर झाला व मोनिकाचा काटा काढण्याचा डाव इरफानने रचला.

सर्वप्रथम इरफानने लासुर स्टेशन येथील दायगाव रोडवरील त्याच्या इनामी जमीनतील घरात २६ जानेवारीला गावातील माणसांकडून बाथरूम चा शोषखड्डा घ्यायचा आहे या नावाखाली सहा फूट खोल खड्डा खोदून घेतला दरम्यानच्या काळात तो मोनिकाशी फोनवरून संपर्कात राहायचा प्रयत्न करू लागला मात्र मोनीका त्याला थोडं बोलून टाळण्याचा प्रयत्न करायची इरफानी पूर्ण कॉल केला तर मोनिकाचा फोन कायम व्यस्त यायचा त्यामुळे इरफानला आणखी चीड यायची त्यात तो दारू व इतर व्यसनाच्या अधीन झाला अखेर पाच फेब्रुवारीला इरफान व मोनिकाचे बोलणे होऊन मोनिका लासुर स्टेशन येथे इरफान ला भेटण्यास तयार झाली ६ फेब्रुवारीला खुनाच्या घटनेच्या दिवशी इरफानने शेतात असणाऱ्या घरामध्ये

मोनिकाचा गळा आवळण्यास व हात पाय बांधण्यास दोऱ्या आणून ठेवला वं त्यानंतर एका कोयत्याला घासून धार देऊन आणून ठेवला मोनिका सहा तारखेला छत्रपती संभाजीनगर येथून तपोवन या रेल्वेमध्ये लासुर स्टेशनला येण्यासाठी बसली तोपर्यंत इरफान ने शांत डोक्याने येथील एका पान टपरीतून स्टिंग हे शीतपेय घेतले लासुरगाव रोड येथील एका भाजीच्या दुकानातुन लिंबू घेतले तोपर्यंत मोनिका लासुर स्टेशन येथील रेल्वे स्टेशनला पोहोचली मग मोनिकाला मोटरसायकलवर बसऊन शेतवस्तीवसरील खड्डा खोदलेला घरात नेले वं तुला जादू करून दाखवतो म्हणुन डोळे मिटवायला लावले व तिचे हात जोडून दोरीने बांधून टाकले वं दुसऱ्या दोरीने गळा आवळण्यास सुरुवात केली मोनिकाचीं शरीरयष्टी इरफानपेक्षा मजबूत असल्याने मोनिकाचा जीव जात नव्हता त्यात इरफान दारू पिऊन फुल्ल झिगाट होता इरफानणे पुन्हा दोरीचा फास आवळला वं मोनिका हातपाय खोडत शांत झाली वं तीचा जीव तडफडून गेला पोलिसांच्या डॉग स्कॉडला तपास लागू नये म्हणून इरफानने मोनिकाच्या मृत शरीरावरील कपडे काढुन जाळून टाकले वं अंगावरील दागिनेही काढुन घेतले व जवळच्या खड्डयात मोनिकाचा मृतदेह ढकलत असताना मृतदेहासह इरफानही खड्यात पडला कसाबसा इरफान नंतर खड्ड्याच्या वर आला वं खड्डा मातीने भरून मृतदेह झाकून टाकला त्यानंतर त्यावर फरश्या टाकल्या वं मग शांतचित्ताने तीची बॅग, चष्मा, दागिने घेऊन अशोक कॉलनितील घरी आला वं मोनिकाची बॅग तिथेच ठेऊन मोनिकाचीं सोन्याची अंगठी व कानातले टापसे लासूरच्या एका सोनाराकडे मोडून टाकून ४४ हजार रुपये रोख घेऊन पुन्हा घरी आला (ते सोनेही पोलिसांनी सोनाराकडून ताब्यात घेतले आहे) व घरातील मोनिकाची बॅग घेऊन रेल्वे स्टेशनला आला व चालू रेल्वेतून मोनिकाचा चष्मा रेल्वेतून खाली फेकून दिला छत्रपती संभाजीनगर येथे पोहचल्यावर एका नाल्यात तीची बॅग फेकून दिली मोनिकाच्या नातेवाईकांनी तोपर्यंत जालना येथील कदीम जालना पोलीस ठाण्यात मिसिंग तक्रार दाखल केली होती याची कल्पना इरफानला होती म्हणुन त्याने तिच्या मोबाईल फोनवरून तिच्या नातेवाईकांना व्हाट्सअपवर मेसेज टाकत मी दुसरे लग्न केले आहे मी वर्षभर येणार नाही माझा शोध घेऊ नका असे मेसेज टाकत राहिला मात्र नातेवाईकानी मेसेज पाहिल्यावर कॉल केल्यावर इरफान फोन उचलत नव्हता त्यामुळे मोनिकाच्या नातेवाईकांना काहीतरी गडबड असल्याची शंका आली त्यामुळे त्नातेवाईकांनी जालना जालना पोलिसांसह लासूर स्टेशन येथील पोलीस ठाणे गाठले त्यात शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस व जालन्याच्या पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवताच इरफानणे खुनाचा उलगडा वं सर्व हकीकत सांगितली.

दोरीने जीव जाणार नाही म्हणुन इरफानने कोयता ठेवला घासून अन ज्याठिकाणी मृत मोनिकाचे दागिने मोडले तो लासूरचा सोनार कोण?.....

दरम्यान मोनिकाचीं शरीरयष्टी मजबूत आहे याची खात्री इरफानला होती त्यामुळे जर मोनिकाचा जीव दोरीने गळा आवळून गेला नाही तर पर्यायी व्यवस्था म्हणुन इरफानने एक कोयता धार लावून घटनास्थळी आणून ठेवला होता जर मोनीकाचा जीव गळा आवळून गेला नसता तर कोयत्याने तीची हत्या करण्याचाही मानस इरफानचा होता हा कोयताही घटनास्थळी शिल्लेगाव पोलिसांना मिळुन आला आहे तसेच मोनिकाचा चष्मा,छत्रपती संभाजीनगर येथील नाल्यात टाकलेली बॅग, वं लासूर स्टेशन येथील सोनाराकडील दागिने शिल्लेगाव पोलिसांनी हस्तगत केल्याची माहितीही पोलिस निरीक्षक सलीम चाऊस यांनी दिली आहे दरम्यान सोने विकत घेणारा तो सोनार कोण हा प्रश्न मात्र सध्या अनुत्तरीत आहे.

सलीम चाऊस ढपोलिस निरीक्षक शिल्लेगाव लइरफान व मोनिका दिवसभरातून तासनतास गप्पा मारून मैत्रीपूर्ण वातावरणात एकमेकांचे मन मोकळे करायचे मात्र काही दिवसानंतर तासंतास गप्पा मारणारी मोनिका इरफानला टाळायला लागली ही बाब इरफानला खटकली वं मनात राग धरून त्यामुळे इरफानने मोनिकाचा काटा काढला असल्याची माहीती समोर आली आहे.

जि.प. गावंदरा शाळेत मातृ - पितृ पूजन दिवस उत्साहात साजरा

तेलगाव ■ सोमेश्वर सोनटक्के



तेलगावः थोरा मोठ्यांचा आदर आणि सन्मान याची शिकवण देणारी आपली भारतीय संस्कृती आहे. त्यातही आई - वडिलांचे आपल्या जीवनातील अनन्य साधारण महत्व असते, याची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मातृ - पितृ दिन साजरा करण्यात येतो.

या दिनाचे औचित्य साधून आज गावंदरा शाळेतील मुलांनी आपापल्या पालकांचे पूजन करून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

आई - वडिलांना तिलक लाऊन, पाय धुवून, अक्षता, पुष्प वाहून, साखर खाऊ घालून औक्षण केले. चिमुकल्या हातानी औक्षण करताना पाहून पालकांचे मन भारावून गेले होते.हा कौतुकाचा क्षण नयमनोहर होता.अनुष्का इयत्ता दूसरीत शिकते, तिचे पालक ऊसतोडणीसाठी कर्नाटक येथे गेले आहेत. तिने औक्षण ताट आणलेले, पण पालक कुणी आले नव्हते. ती रडत म्हणाली, ' मॅडम माझ कुणीच आलं नाही. ' तिचे शब्द ऐकून नकळत माझ्याही डोळ्यात पाणी आले मी म्हणाले,'अगं , वेडे काही हरकत नाही, मी पण तुझीच आहे, तू मलाओवाळ.'यावरतिच्याचेहऱ्या वरची चमक हाच माझा खरा पुरस्कार, असे मला वाटले. सर्व मुलांनी त्यांच्या पालकांसोबत सर्व शिक्षकांचे औक्षण केले.इतकेच नाही तर पालकांनीही केलेले औक्षण याहून आनंदाचा क्षण आणि याहून मोठा सत्कार एका गुरुसाठी अजून काय असू शकेल.शाळा मराठी, इंग्रजी, उर्दू कोणतीही माध्यमाची असली तरी सगळीकडे निष्पाप विद्यार्थी शिकत असतात. आपली संस्कृती संवर्धन करण्यासाठी आणि मुलांमध्ये अशी मूल्ये रुजवण्यासाठी या परंपरा साजऱ्या करणे आवश्यक आहे.या छोट्या वाटणाऱ्या प्रसंगातून नकळत सकारात्मक परिणाम संस्कार बालमनावर होत असतात. मातृ - पितृ पूजन दिवस साजरा करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. आर. जी. मुंडे , श्री. विशाल कदम , श्री. नवनाथ बडे सर, श्रीम. जया घुगे - मुंडे मॅडम यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले.

विद्यार्थिनींनी परीक्षेतील गुणांबरोबर नैतिक मूल्य जपणे गरजेचे-न.प. मुख्याधिकारी ढोपे



केज ■ प्रतिनिधी

जय भवानी कन्या प्रशाला केज येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनींना निरोप व बक्षीस वाटपाचा संयुक्त कार्यक्रम

केज : जय भवानी कन्या प्रशाला केज येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप व यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वाटपाचा कार्यक्रम शाळेचे मुख्याध्यापक देशमुख पी एम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर प्रामुख्याने केज नगरपंचायत चे नवनियुक्त मुख्याधिकारी माननीय ढोपे साहेब, धारूर बस आगाराचे प्रमुख श्रीमान चौरे साहेब, बिक्कड साहेब, समाजसेवक हनुमंत भोसले, नगरपरिषद सदस्य श्रीमान गाढवे, शिक्षणप्रेमी दत्ताजी काकडे, सावंत साहेब इंगळे विठ्ठल यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना नगरपंचायत केज चे मुख्याधिकारी ढोपे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वतःच्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.शालेय जीवनात परीक्षेतील गुण हे अतिशय महत्त्वाचे असतात परंतु हे सांगताना त्यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनात नैतिक मूल्याचे महत्त्व कसे आहे हे उदाहरणासहित विद्यार्थिनींना पटवून सांगितले. आचार,विचार, समाजाप्रती आपले देणे,वडीलधाऱ्यांचा सन्मान, देशाप्रती प्रेम,कर्तव्य हे जीवनात अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत मांडले. केवळ पद,पैशाच्या मागे न लागता एक चांगला व्यक्ती म्हणून समाजात प्रतिमा उभी करावी असा आग्रह त्यांनी विद्यार्थिनींना केला.

धारूर आगाराचे प्रमुख चौरे साहेब व बिकड साहेब यांनी विद्यार्थिनींना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शिक्षणप्रेमी पालक व साबला गावचे प्रतिष्ठित नागरिक काकडे यांनी शाळेचे कौतुक करून सर्व विद्यार्थिनींना व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या तसेच ९७ टक्के मार्क मिळवणाऱ्या विद्यार्थिनींना पाच हजार रुपयाची रोख बक्षीस जाहीर केले.

शिक्षण क्षेत्रातील नामवंत तसेच समाजसेवक प्रा.हनुमंत भोसले यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत केवळ गुण घेणे म्हणजे यश मिळवणे असे नव्हे तर कमी गुण असताना सर्वोच्च पदावर गेलेले अधिकारी व उद्योजक यांची उदाहरणे देत मार्क कमी जास्त मिळतील परंतु संघर्ष महत्त्वाचा हा संदेश दिला. शाळेचे मुख्याध्यापक देशमुख पी.एम. यांनी विद्यार्थिनींना मोबाईल चा वापर टाळा पुस्तक वाचा असा संदेश देऊन आई-वडिलांची स्वप्न साकार करण्याचे हेच दिवस असल्याचे सांगितले व परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

आभार प्रदर्शन शाळेची ज्येष्ठ शिक्षक श्री खुळे के व्ही यांनी केले यावेळी त्यांनी शाळेतील सर्व नवीन उपक्रम मान्यवरासमोर समोर मांडले उत्तरोत्तर प्रगती करण्याचे आश्वासन दिले व उपस्थितीबद्दल शाळेच्या वतीने आभार मानले.

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक श्री गिरी एस एम यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती गीता जगताप सर्वश्री ज्येष्ठ शिक्षक सर्वश्री खुळे के.व्ही., नाईकनवरे ए.जी.,बचुटे एम.ए.,देशमुख व्ही. पी.,गिरी एस.एम., श्रीमती पवार एस एस,देशमुख पी आर.,

सौ.मोरे मॅडम, सौ जाधव मॅडम, सौ. खतिले मॅडम शिंदे बी एम, कुलकर्णी मॅडम,शोएब सय्यद, गिराम बी एम. यांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी व पालक यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

कोकण विभागीय शिक्षक लोकशाही आघाडीची कार्यकारीणी जाहीर

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी
विठ्ठल ममताबादे

पेण येथील कोकण विभागीय टीडीएफची बैठक संपन्न; बैठकीत घेण्यात आले अनेक महत्वाचे निर्णय ;नवीन कार्यकारिणीला देण्यात आल्या शुभेच्छा



उरण : बुधवार दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी रायगड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्या सेवक सहकारी पतपेढी मर्या. पेण येथे कोकण विभागीय टीडीएफची बैठक अतिशय उत्साहात संपन्न झाली.या बैठकीला ठाणे, पालघर, रायगड,रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोकण विभागीय लोकशाही आघाडीचे सर्व सभासद तसेच काही जिल्ह्यांचे जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीला सभेचे अध्यक्ष राज्याचे कार्याध्यक्ष नरसू पाटील सर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून शिवजयंती साजरी करण्यात आली.तदनंतर या बैठकीमध्ये विषय पत्रिकेनुसार कामकाज सुरु करण्यात आले.या बैठकीत विभागातील सर्व सभासदांच्या व उपस्थित जिल्हा पदाधिकाऱ्यांनी एकमताने कोकण विभागीय शिक्षक लोकशाही आघाडीची पुढील पाच वर्षासाठी कार्यकारणी निश्चित करण्यात आली.

नूतन कार्यकारणी पुढील प्रमाणे :- अध्यक्ष-श्री.सागर पाटील(रत्नागिरी),कार्याध्यक्ष-श्री.संतोष पावडे (पालघर) , उपाध्यक्ष -मायकल घोंसाल्विस (वसई),रमेश कृष्णा म्हात्रे (रायगड),श्री.अंबर घोलप(ठाणे) श्री.अविनाश पाटील (रत्नागिरी),श्री.अजय शिंदे (सिंधुदुर्ग),सचिव - श्री.राजेंद्र पालवे (रायगड),सहसचिव -श्री सुशांत कविस्कर(रत्नागिरी),श्री विजय मयेकर (सिंधुदुर्ग),कोषाध्यक्ष- श्री सुरेंद्र शिंदे (ठाणे),संघटक -श्री गणेश प्रधान (पालघर),श्री.संभाजी देवकते रत्नागिरी, महिला प्रतिनिधी - .श्रीम अर्चिता कोकाटे (रत्नागिरी),श्रीम. मीनल गायकवाड (पालघर),कार्यकारणी सदस्य म्हणून श्री.रुपेश वझे (डहाणू),श्री.रमाकांत गावंड (रायगड),श्री.सचिन मिरगल (रत्नागिरी),श्री.अशोक गीते (सिंधुदुर्ग),स्वीकृत सदस्य म्हणून श्री. के डी पाटील (पालघर),श्री.भालचंद्र नेमाडे(मीरा-भाईंदर),श्री. विनोद पन्हाळकर (रायगड) यांची निवड करण्यात आली आहे.विषय क्रमांक २ नुसार महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडीचे राज्य अधिवेशन कोकण विभागातील पालघर जिल्ह्यामध्ये घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

या बैठकीला कोकण विभागातील सर्व जिल्ह्यांमधून अनेक सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोकण विभागीय कार्यकारणी निवडीनंतर सर्व उपस्थित मान्यवरांनी अत्यंत उत्साहात नूतन अध्यक्ष व कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या. कोकण विभागीय कार्यकारी निवडीचे कामकाज महाराष्ट्र टीडीएफचे राज्य कार्याध्यक्ष नरसू पाटील सर व राज्य सचिव रोहित जाधव सर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.

केज तालुक्यातील येवता येथील ४९ भाविक कुंभमेळ्यासाठी प्रयागराजकडे रवाना;अवादा कंपनीने भाविकांना प्रयागराजला जाण्यासाठीचे मोफत केले आयोजन;या उपक्रमाचे सर्व स्तरातून होतेय कौतुक

केज ■ प्रतिनिधी



केज : केज तालुक्यातील येवता येथील ४९ भाविक कुंभमेळ्यासाठी प्रयागराजकडे रवाना झाले आहेत तर अवदा कंपनीने भाविकांना प्रयागराजला जाण्यासाठीचे मोफत आयोजन केले आहे.या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यात अवादा कंपनीचा पवनचक्की प्रकल्प चालू झाला असून ज्या लोकांना कुंभमेळ्यासाठी जाण शक्य नाही अशा लोकांसाठी अवादा कंपनीने येवता येथील ४९ भाविकांना कुंभमेळ्यासाठी जाण्याची सोय केल्याने भाविकातून कंपनीचे आभार व्यक्त केले जात आहे.

या यात्रेमध्ये अवादा कंपनीकडून भाविकांच्या सर्व सुख सोयी मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत असेही अवदा कंपनीचे कर्मचारी राहुल देठे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना स्पष्ट केले आहे. सदरील यात्रेकरूंना आयडेंटी कार्ड देऊन यात्रेमध्ये काही अडचण आल्यास या कार्डचे महत्व समजावून सांगितले कोणी जर यात्रेच्या दरम्यान चुकले तर हे कार्ड पोलिसांना दाखविल्यास आपण कुठेही चुकनार नाहीत व अडचण भासणार नाही. आपण आपले कार्ड यात्रा पूर्ण होईपर्यंत आपल्या गळ्यात ठेवावे अशी माहिती राहुल देठे यांनी समजावून यात्रेकरूंना सांगितले. यात्रेसाठी ट्रॅव्हल्स, राहणे, जेवण यासह इतर सुविधा कंपनीकडून मोफत उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. यामुळे भाविकांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

सदर यात्रा चार ते पाच दिवसांची असून या रूटवर यात्रेकरूंची सर्व सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे यामध्ये अवादा कंपनीकडून ट्रॅव्हलिंग जेवण व इतर सोयी करण्यासाठी अवादा कंपनीचे कर्मचारी राहुल यादव हे यात्रेकरूंच्या सोबत सर्व यात्रा पूर्ण होईपर्यंत राहणार आहेत.

सदरील यात्रेकरूंना निरोप देण्यासाठी गावचे प्रथम नागरिक सरपंच विलास आप्पा जोगदंड तसेच कंपनीचे कर्मचारी राहुल देठे यांच्या सह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ट्रॅव्हल्स गावात आल्यानंतर सर्वप्रथम ट्रॅव्हल्सला अवादा कंपनीचे बॅनर लावून ट्रॅव्हल्सची पूजा करून गाडीला हिरवा झेंडा दाखवून ४९ भाविक यात्रेसाठी रवाना झाले आहेत.

खा.रजनीताई पाटील यांच्यावर पुन्हा मोठी जबाबदारी हिमाचल आणि चंदिगड दोन राज्याची जबाबदारी

केज ■ प्रतिनिधी



केज दि.(१५) काँग्रेस पक्षात निष्ठेला महत्व आहे याची प्रचिती पुन्हा काँग्रेसच्या नेत्या खा. रजनीताई पाटील यांच्या रुपाने बीड जिल्ह्याला आली असून परवा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या जनरल सेक्रेटरी व राज्याचे इंचार्ज यांची पक्षाने नावे जाहीर केली यामध्ये खा. रजनीताई पाटील यांच्यावर पुन्हा पक्षाने मोठी जबाबदारी दिली असून त्यांना हिमाचल प्रदेश व चंदिगड या दोन्ही राज्याचे प्रभारी केल्याने आता खा. रजनीताई पाटील यांना राहुल गांधी व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या टीम मध्ये काम करण्याची संधी उपलब्ध झाली असून त्यांच्या या निवडीबद्दल जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला आहे तर गांधी घराण्यावर असलेली निष्ठा परत कामाला आल्याची भावना याप्रसंगी व्यक्त होत आहे.

काँग्रेसच्या नेत्या खा. रजनीताई पाटील यांनी सोनिया गांधी व गांधी परिवारावर ठेवलेली निष्ठा याचेच हे फळ आहे. परवा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या जनरल सेक्रेटरी व राज्याचे प्रभारी यांची नावे पक्षाने जाहीर केले. यामध्ये हिमाचल प्रदेश व चंदिगड या दोन राज्याच्या प्रभारी म्हणून काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या तथा राज्यसभेच्या खासदार रजनीताई पाटील यांना जबाबदारी देण्यात आली आहे सोनिया गांधी यांच्या टीम मध्ये यापूर्वी देखील रजनीताई यांनी काम पाहिले आहे व आता पुन्हा राहुल गांधी आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या टीम मध्ये देखील काम करण्याची संधी रजनीताई यांना उपलब्ध झाली असून त्यांच्या या निवडिबद्दल जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक,मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक,मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) **RNI NO : MAHMAR/2022/82242**